७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

सोमवार, दि. २५ मे २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १४९ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

# पुरंदर कृषी एक्स्पो २०२६

## शेतकऱ्यांना नवी प्रेरणा देणारे : कृषीमंत्री दत्तात्रय भरणे




सासवड : 'पुरंदर कृषी एक्स्पो २०२६' या कृषी व पशू प्रदर्शनाला भेट प्रसंगी राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे सोबत आयोजक मा. आमदार संजय जगताप, सौ. राजवर्धिनी जगताप व इतर मान्यवर.

### ३० जूनपूर्वी शेतकऱ्यांना कर्जमाफी आणि प्रोत्साहन अनुदानाचा लाभ देणार; जमिनी विकू नका, येणारे दिवस शेतीचे: भरणे यांचे आवाहन

**सासवड (दै. संध्या)**

"बदलत्या हवामानामुळे शेतकरी सातत्याने अडचणीत येत आहे. अशा परिस्थितीत आम्ही शासनाच्या वतीने शेतकऱ्यांना सावरण्याचा पूर्ण प्रयत्न करत असून, येत्या ३० जूनपूर्वी शेतकऱ्यांना कर्जमाफी आणि प्रोत्साहन अनुदानाचा लाभ दिला जाईल," अशी महत्त्वपूर्ण घोषणा राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी येथे केली.

सासवड येथे शरद कृषी व पर्यावरण विकास प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित 'पुरंदर कृषी एक्स्पो २०२६' या कृषी व पशू प्रदर्शनाला रविवारी (ता. २४) कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी भेट दिली. या प्रदर्शनाचे उत्तम आयोजन व नियोजन केल्याबद्दल माजी आमदार संजय जगताप व ग्रामीण संस्थेच्या अध्यक्षा राजवर्धिनी जगताप यांचे कौतुक करत त्यांनी जगताप कुटुंबाच्या योगदानाचा गौरव केला. या प्रदर्शनाला शेतकरी, युवक आणि नागरिकांनी उदंड प्रतिसाद दिला.

याप्रसंगी जिल्हा बँकेचे अध्यक्ष डॉ. दिगंबर दुर्गाडे, उपाध्यक्ष सुनील चांदेरे, संचालक रमेश थोरात, आप्पासाहेब जगदाळे, दिलीप मोहिते, पुजा बुट्टे पाटील, निर्मला जागडे, संजय काळे, तसेच सारिका भरणे, हेमंतकुमार माहूरकर, आयोजक माजी आमदार संजय जगताप, ग्रामीण संस्थेच्या अध्यक्षा राजवर्धिनी जगताप, समरादित्य जगताप, कात्रज डेअरीचे उपाध्यक्ष तानाजी जगताप, निरा मार्केट कमिटीचे सभापती संदीप फडतरे, संचालक मनिषा नाझीरकर, देविदास कामथे, संभाजी काळाणे, विठ्ठल मोकाशी, तुषार माहूरकर यांसह संयोजक प्रदीप पोमण, प्रकाश पवार, संभाजी गरुड, विलास जगताप, रवींद्रपंत जगताप, सतिश शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.



**कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांचे प्रमुख संदेश**

- आजची शेती आधुनिक आणि नवीन तंत्रज्ञानाने केली पाहिजे.
- उत्पादन वाढीसाठी नवीन गोष्टींचा स्वीकार करा.
- केंद्र व राज्य शासनाच्या योजनांचा लाभ घ्या आणि नैसर्गिक शेतीकडे वळा.
- खर्च कमी करून उत्पन्न वाढवण्यासाठी प्रयत्न करा.

### जगताप कुटुंबाचे योगदान

“हे कुटुंब माजी आमदार कै. चंदुकाका जगताप यांचे असून त्यांनी सहकारात कडक आणि शिस्तबद्ध काम केले. तालुक्यातील नागरिकांसाठी प्रत्येक क्षेत्रात चंदुकाकांनी मोठे योगदान दिले. त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवून संजय जगताप हे उत्तम काम करीत आहेत असे गौरवोद्गार कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी काढले.”

### आधुनिक शेतीची गरज

“आजची शेती आधुनिक आणि नवीन तंत्रज्ञानाने केली पाहिजे. उत्पादन वाढीसाठी नवीन गोष्टींचा स्वीकार करावा, याची माहिती अशा प्रदर्शनातून मिळते. शेतकऱ्यांनी केंद्र व राज्य शासनाच्या कृषी विभागाच्या नवनवीन योजनांमध्ये भाग घ्यावा आणि नैसर्गिक शेतीकडे वळावे. खर्च कमी करून उत्पन्न वाढवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत असे आवाहन कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी केले. ”

‘ ‘नवीन बियाणे आणि खते यांत मोठे संशोधन होत आहे. शेतकऱ्यांनी नेहमी कृषी विभागाच्या संपर्कात राहून नवीन पद्धतीने शेती करावी. सर्वात महत्त्वाचे म्हणजे आपल्या जमिनी विकू नका, कारण येणारे दिवस हे केवळ आणि केवळ शेतीचेच असणार आहेत.”

- दत्तात्रय भरणे, कृषी मंत्री







## पुरंदर कृषी एक्स्पोत तंत्रज्ञानाची क्रांती.. ‘लोकशिक्षणा’तून शेतकरी समृद्धीकडे : माजी मंत्री दिलीपराव देशमुख



**सासवड (दै. संध्या) :** "कृषी क्षेत्रात आज मोठी क्रांती झाली असून, शेतकऱ्यांचे उत्पन्न आणि उत्पादन वाढणे काळाची गरज आहे. बदलत्या काळात कमी शेती आणि उपलब्ध पाण्यातून शेती फुलवण्याची ताकद येथील शेतकऱ्यांमध्ये आहे. अशा परिस्थितीत 'पुरंदर कृषी एक्स्पो २०२६' सारखी प्रदर्शने शेतकऱ्यांसाठी नवी प्रेरणा देणारी आणि लोकशिक्षणाचे प्रभावी माध्यम ठरणार आहेत," असा विश्वास राज्याचे माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी येथे व्यक्त केला.

सासवड येथील स्व. चंदुकाका जगताप यांनी स्थापलेल्या शरद कृषी व पर्यावरण विकास प्रतिष्ठानच्या वतीने शिवाजी इंग्लिश मीडियम स्कूलच्या मैदानावर भव्य 'पुरंदर कृषी एक्स्पो २०२६' या कृषी व पशू प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. रविवारी (ता. २४) या प्रदर्शनाला शेतकरी, युवक आणि नागरिकांनी उदंड प्रतिसाद दिला. याप्रसंगी माजी मंत्री देशमुख बोलत होते.

माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी आपल्या भाषणात आयोजकांच्या पाठीवर कौतुकाची थाप दिली. ते म्हणाले,"अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने हे प्रदर्शन उभे करण्यात आले असून, यात ग्रामीण संस्थेच्या अध्यक्षा राजवर्धिनी जगताप यांचे योगदान मोठे आहे. त्यांचे महिला सक्षमीकरणाचे काम कौतुकास्पद आहे. तसेच, माजी आमदार संजय जगताप यांच्याकडे विकासाच्या विविध कल्पना आहेत. कार्यकर्ता उभा करणे, तो टिकवणे, त्याला सोबत घेऊन सन्मान देणे हे नेतृत्वाचे उत्तम गुण त्यांच्यात आहेत. पुरंदरला छत्रपती शिवरायांच्या काळापासून मोठा इतिहास आहे, हे वैभव टिकवणे आणि वाढवणे महत्त्वाचे आहे."

या सोहळ्याप्रसंगी माजी मंत्री दिलीपराव देशमुख आणि राजेंद्र पाटील यांचे आयोजक माजी आमदार संजय जगताप, ग्रामीण संस्थेच्या अध्यक्षा राजवर्धिनी जगताप, समरादित्य जगताप यांनी स्वागत केले. यावेळी कात्रज दूध संघाचे उपाध्यक्ष तानाजी जगताप, नगरसेवक अजित जगताप, पंचायत समिती सदस्य माऊली यादव, निरा बाजार समितीचे सभापती संदीप फडतरे, देवीदास कामथे, अशोक निगडे, शाहजहान शेख, मनिषा नाझीरकर, तुषार माहूरकर, संयोजक प्रदीप पोमण, प्रकाश पवार, संभाजी गरुड, विलास जगताप, संभाजी काळाणे, अक्षय उरसळ, रवींद्रपंत जगताप आदींसह अनेक मान्यवर, पदाधिकारी आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### ढिंग-टांग

नाही आता कोणतीही अडचण नाही. मी सकाळी दहापासून दुपारी एक वाजेपर्यंतच भ्रष्टाचार रोकणाऱ्या समितीचा अध्यक्ष असतो!



## एकनाथ शिंदे अचानक दिल्ली दौऱ्यावर

### केंद्रीय गृहमंत्री अमित शहांची घेणार भेट

**मुंबई (दै. संध्या)**

सत्ताधारी शिवसेनेचे सर्वेसर्वा तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे रविवारी अचानक दिल्ली दौऱ्यावर गेलेत. ते तिथे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेणार आहेत. या भेटीचे नेमके कारण समजू शकले नाही, पण ही भेट विधान परिषदेच्या निवडणुकीतील जागावाटप व जागांची अदलाबदली या भोवती फिरती राहणार असल्याचा अंदाज आहे. विशेषतः ऑपरेशन टायगरवर या भेटीत चर्चा होईल काय? असाही प्रश्न या निमित्ताने चर्चिला जात आहे. विधान परिषदेच्या 17 जागांसाठी येत्या 18 जून रोजी निवडणूक होणार आहे. त्यात सत्ताधारी महायुतीचा जागावाटपाचा फॉर्म्युला ठरल्याची माहिती आहे. या फॉर्म्युल्यानुसार, भाजप सर्वाधिक 12 जागांवर निवडणूक लढवेल. तर शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसला अनुक्रमे 3 व 2 जागांवर समाधान मानावे लागेल. पण महायुतीत 1-2 जागांवर वाद सुरू असल्याची माहिती आहे. शिंदे गटाने विधान परिषदेच्या 6 जागांची मागणी केली आहे. पण भाजपने त्यांना केवळ 4 जागा देण्याची तयारी दर्शवली आहे. त्यामुळे एकनाथ शिंदे आज केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेऊन त्यांच्याकडे आपल्या पक्षाचे गाऱ्हाणे मांडणार आहेत.

### संसद रत्न २०२६ पुरस्कार जाहीर : जुलैमध्ये दिल्लीत होणार गौरव सोहळा

## डॉ. श्रीकांत शिंदे, नरेश म्हस्के, स्मिता वाघ यांच्यासह पाच जणांची निवड

**मुंबई (दै. संध्या)**



संसदेच्या कामकाजात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या लोकप्रतिनिधींना दिल्या जाणाऱ्या प्रतिष्ठित 'संसद रत्न' पुरस्कार २०२६ ची घोषणा करण्यात आली आहे. यावर्षीच्या पुरस्कारांमध्ये महाराष्ट्राने आपले निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले असून, राज्यातील पाच खासदारांना या बहुमानाने गौरवण्यात येणार आहे. देशभरातून निवडण्यात आलेल्या एकूण १२ खासदारांपैकी ५ खासदार महाराष्ट्रातील आहेत, ही राज्यासाठी अभिमानाची बाब ठरली आहे. यंदाच्या पुरस्कार विजेत्यांमध्ये लोकसभेतील चार आणि राज्यसभेतील एका खासदाराचा समावेश आहे. यात वैयक्तिक श्रेणीमध्ये डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे (कल्याण) यांची निवड झाली आहे. त्यांच्यासह नरेश गणपत म्हस्के (ठाणे), डॉ. हेमंत विष्णू सावरा (पालघर), स्मिता उदय वाघ (जळगाव) आणि राज्यसभेतील पुण्याच्या खासदार डॉ. मेधा विश्राम कुलकर्णी यांना संसद रत्न पुरस्कार जाहीर झाला आहे. विशेष म्हणजे, यामध्ये दोन महिला खासदारांचा समावेश असल्याने राज्याच्या स्त्री-शक्तीचाही गौरव झाला आहे. देशभरातून या पुरस्कारासाठी एकूण १२ खासदारांची निवड करण्यात आली आहे. यामध्ये जगदंबिका पाल (उत्तर प्रदेश), पी.पी. चौधरी (राजस्थान), निशिकांत दुबे (झारखंड), प्रवीण पटेल (उत्तर प्रदेश), विद्युत बरन महतो (झारखंड), लुंबाराम चौधरी (राजस्थान) आणि नरहरी अमीन (गुजरात) यांचा समावेश आहे. या खासदारांची निवड २०२६ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनापर्यंत संसदेत केलेल्या त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीच्या आधारे करण्यात आली आहे.

## संपादकीय

# नेत्यांच्या मनोरंजनात मूलभूत प्रश्न गायब

तुम्हा सगळ्यांमध्ये जो 'सुसंवाद' सुरू आहे तो पाहून आम्हाला तुमचे प्रचंड कौतुक वाटत आहे . अजित पवारांच्या राष्ट्रवादीला शिंदे सेनेचे मंत्री संजय शिरसाट यांनी मोलाचे सल्ले दिले. राष्ट्रवादीचे काही नेते अजूनही आमच्या संपर्कात आहेत. त्यांच्याकडे क्लेरिकल मिस्टेक झाली तरी कोणी अधिकृत खुलासे करत नाही, असे सांगत दादांच्या राष्ट्रवादीवरील आपले प्रेम व्यक्त केले आहे. त्याला तितक्याच तत्परतेने राष्ट्रवादीचे मंत्री हसन मुश्रीफ यांनी, तुम्ही आमच्या पक्षावर बोलू नका. तुमच्याकडे काय चालले आहे ते बघा... असे म्हणत प्रेमाची परतफेड केली आहे. शिरसाट आणि मुश्रीफ यांच्या प्रेमात उदय सामंत यांनी एन्ट्री घेतली आहे. राष्ट्रवादीचे आनंद परांजपे यांना आमच्या पक्षात घेताना राष्ट्रवादीच्या वरिष्ठ नेत्यांना विचारूनच घेतल्याचा गौप्यस्फोट केला आहे. राष्ट्रवादी पक्षाला, ठाणे जिल्ह्यात अडचणीत आणून, आपलाच एक नेता, मित्र पक्षाला देणाऱ्या नेत्यांचे आपापसातील प्रेम पाहून आमचे मन भरून आले. पक्ष राहो अथवा न राहो... मैत्री, प्रेम टिकले पाहिजे... हा उदात्त विचार पाहून आमचा "सब भूमी गोपाल की" या विधानावर गाढा विश्वास बसला आहे. या अनोख्या प्रेमाची चर्चा सर्वत्र होऊ लागली तेव्हा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी 'चूप बसा, मी सांगेपर्यंत कोणी बोलू नका...' असा प्रेमळ सल्ला देताच सगळे गप्प झालेले पाहून आम्हाला हर्षवायू होणेच बाकी आहे. तिकडे गोपीचंद पडळकर यांच्यासारख्या अभ्यासू लोकप्रतिनिधीचे भाषण ऐकून आम्हाला आमच्याच शिक्षणावर शंका येऊ लागली आहे. एका सभेत बोलताना ते म्हणाले, "होर्मुझ नावाची सामुद्रधुनी महिनाभर बंद पडली. त्यामुळे आपल्या एकाच देशाचे तेल थांबलं होतं का..? अनेक राष्ट्रांचे तेल तिथे थांबलं होतं..! आता मोदी साहेब तिथे गेले. होर्मुझपासून समुद्राच्या खालून पाइपलाइन करून भारतात तेल आणून भारताचा प्रश्न कायमचा मिटवता येतोय का? याच्यावर विचार सुरू आहे..." पडळकर यांचे इतके अभ्यासपूर्ण भाषण पाहून आपल्याला असे भाषण करता येत नाही याचे फार वाईट वाटले. पडळकरजी, मुंबईत "अभ्यासपूर्ण भाषणाची तयारी" याचे क्लासेस सुरू करा. खा. संजय राऊत यांनी लगेच, पाइपलाइन काय दोन दिवसाचा विषय आहे का? त्याला अनेक वर्षे लागतात... असे सांगून होर्मुज ते भारतापर्यंत समुद्रात पाइपलाइन होऊ शकते यावर शिक्कामोर्तब केले आहे. ही नेते मंडळी ज्या शाळेत शिकली त्या शाळेत आम्हाला का कोणी पाठवले नाही याचे फार वाईट वाटले. राऊत यांचा विषय निघाला म्हणून आठवले. सध्या सोशल मीडियावर एका तरुणाच्या काही रिल्स प्रचंड लोकप्रिय ठरले आहे. एक तरुण पळत पळत येतो आणि, "राऊत साहेब, गॅस संपला. आता काय करायचे?" असा प्रश्न करतो. त्याला राऊत म्हणतात, "फक्त जय श्रीराम म्हणायचं... सिलिंडर घरपोच येईल..." ही अशी एवढी कल्पकता कुठल्या शाळेत शिकल्यावर येते, हा प्रश्न आम्हाला पडला आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात वेगवेगळ्या नेत्यांची ही अभ्यासपूर्ण विधाने पाहून, सोशल मीडियात महाराष्ट्रातल्या नेत्यांविषयी सुरू असलेले गुणगान, एकमेकांमधील सुसंवाद ऐकून महाराष्ट्राच्या राजकारणाची आन-बान आणि शान उंचावली आहे..! त्यामुळे उगाच कॉकरोच जनता पार्टी नावाचे सोशल मीडियातील एक अकाउंट वेगाने वाढल्याचे पाहून चिंता करू नका. आपले नेते महाराष्ट्राला पुढे नेण्यासाठी जे काही करत आहेत ते बघा... त्यांचे कौतुक करा... असे विद्वान नेते आपणच निवडून दिले म्हणून आधी स्वतःची पाठ थोपटून घ्या... एवढ्या सगळ्या मनोरंजनामुळे तुम्हाला बेरोजगार असल्याचे जाणवत नाही... अंडी, दूध, वडापाव, चहा महाग झाल्याचा त्रास होत नाही... पेट्रोल, डिझेलसाठी रांगेत उभे राहिले तरी थकवा येत नाही... याचे सगळे श्रेय महाराष्ट्रातल्या सर्वपक्षीय नेत्यांना दिले पाहिजे... सत्ताधारी तिन्ही पक्षांच्या नेत्यांमधील सुसंवादाला दिले पाहिजे... विरोधी पक्षात असूनही कोणाच्याही विरुद्ध काहीही न बोलण्याचा दृढ संकल्प करून गप्प बसलेल्या विरोधकांना दिले पाहिजे... तुम्हाला तुमच्या मूलभूत प्रश्नाकडे कोणी येऊ देत नाही त्याचा आनंद मानला पाहिजे...

## संस्कृत सुभाषित

धनं रूपमवैक्लव्यं, धनं कुलं सुमंगलम्।
धनं यौवनम्लनं धनमायुर्निरायम्।।
अर्थ – संपत्ती म्हणजे काय? विकाररहित रूप, मंगलमय कूळ, सदासतेज तारुण्य आणि निरामय निरोगी आयुष्य म्हणजेच संपत्ती होय.

## आगामी साप्ताहिकी

२५ मे २०२६ सोमवार
गंगादशहरा समाप्ती
गंगवतार

२६ मे २०२६ मंगळवार

२७ मे २०२६ बुधवार
कमला एकादशी
बकरीद

२८ मे २०२६ गुरुवार
प्रदोष
स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती

२९ ऑगस्ट २०२६ शुक्रवार

३० मे २०२६ शनिवार
गोवा राज्य दिन
पौर्णिमा प्रारंभ सकाळी ११.५७

३१ मे २०२६ रविवार
अहिल्याबाई होळकर जयंती (तारेखप्रमाणे)
पौर्निमा समाप्ती दुपारी २.१४

## उपदेशकथा



बंगाली साहित्यातील एक युगपुरुष मायकेल मधुसूदन दत्त हे एकदा पूर्व बंगालच्या पाटनगरीत एका शहरास गेले होते तेव्हा तेथील साहित्यप्रेमी युवकांनी त्यांना मानपत्र दिले. आता मानपत्रांची भाषा म्हणजे फुलोरा आलाच. त्या युवकांनी लिहिले होते, आपली विद्या, आपली बुद्धी, आपली प्रतिभा यांच्या तेजाने आम्ही साहित्यरसिक प्रफुल्लवदन झालो आहोत. फक्त एका गोष्टीचा विषाद वाटत होता. आम्ही ऐकले होते की, आपण इंग्रज झाला आहात. (कारण त्यांनी एका इंग्रज मडमेशी संसारही थाटला होता) पण आपल्या आचरणाने आणि आपल्या संभाषणाने आमची भीती अनाठायी असल्याचे सिद्ध झाले, हे नमूद करण्यास आनंद वाटतो. मधुसूदन कवींनी उत्तरादाखल म्हटले, माझ्यासंबंधी तुम्हा मंडळींचा इतर कोणताही गैरसमज समजण्यासारखा आहे. मात्र मी 'साहेब' झालो आहे, असं म्हणणं अन्यायाचं ठरेल. विधात्यानंच इंग्रज होण्याच्या माझ्या मार्गात खीळ घालून ठेवली आहे. माझ्या बैठकीच्या खोलीत नि निजायच्या खोलीत, अशा दोन्ही ठिकाणी मी मोठे आरसे टांगून ठेवले आहेत. साहेब होण्याची इच्छा मनात उद्भवलीच तर मी आरशात मुखडा पाहतो. तेवढी मात्रा लागू पडते. मी शंभर टक्के बंगाली आहे. इतकंच नव्हे तर मी 'बांगाल' (पूर्व बंगाल निवासी) आहे. जेसोर (यशोहर) चा! .

कथा उपदेश : माणूस किती मोठा झाला तरी आपले पूर्वीचे स्थान विसरत नाही.

## पंचांग

| | |
|---|---|
| २५ मे २०२६ | २८:०८:३१+ |
| सोमवार | योग:वज्र २७:१४:४९+ |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:तैतिल १६:४६:५१ |
| अधिक ज्येष्ठ शके | करण:गर २९:११:१०+ |
| संवत्– १९४८ | सूर्य:वृषभ |
| संवत्सर – पराभवनाम | चन्द्र:कन्या०९:०६:५९ |
| अयन– उत्तरायणारंभ | हिजरी सन् – १४४६ |
| मास– अधिक ज्येष्ठ | मुस्लिम मास – जिल्हेज |
| ऋतु– हेमंत | तारीख – ८ |
| शुक्ल पक्ष | विशेष |
| तिथि:दशमी २९:११:१०+ | गंगादशहरा समाप्ती |
| नक्षत्र:उत्तराफाल्गुनी | गंगवतार |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ९५९

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 5 | | | | 9 | 1 | 7 | |
| | 9 | 7 | | | 8 | 4 | | 6 |
| | | | 7 | | 1 | 5 | | |
| | 3 | | | 1 | | 9 | 5 | |
| 7 | 2 | | | | | | 8 | 4 |
| | 8 | 5 | | 7 | | | 6 | |
| | | 2 | 6 | | 5 | | | |
| 3 | | 9 | 1 | | | 6 | 2 | |
| | 7 | 6 | 9 | | | | 1 | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोड्याचे केवळ एकच उत्तर आहे.या कोड्याला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ९५८ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | 5 | 7 | 4 | 1 | 3 | 8 | 2 | 6 |
| 3 | 1 | 4 | 6 | 8 | 2 | 7 | 5 | 9 |
| 6 | 2 | 8 | 7 | 9 | 5 | 4 | 1 | 3 |
| 4 | 8 | 5 | 3 | 2 | 6 | 1 | 9 | 7 |
| 2 | 6 | 9 | 8 | 7 | 1 | 3 | 4 | 5 |
| 7 | 3 | 1 | 9 | 5 | 4 | 2 | 6 | 8 |
| 1 | 9 | 3 | 2 | 6 | 7 | 5 | 8 | 4 |
| 5 | 4 | 6 | 1 | 3 | 8 | 9 | 7 | 2 |
| 8 | 7 | 2 | 5 | 4 | 9 | 6 | 3 | 1 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १०८५ – कॅस्टिलचा राजा आल्फोन्सो सहाव्याने स्पेनमधील टोलेडो शहर मूरांकडुन जिंकले.
- १६५९ – रिचर्ड क्रॉमवेलने ईंग्लंडच्या रक्षकपदाचा राजीनामा दिला.
- १८१० – सेमाना दि मेयो – आर्जेन्टिनात नागरिकांनी बोयनोस एर्समधून स्पेनच्या व्हाइसरॉयला हाकलले.
- १८६५ – अमेरिकन गृहयुद्ध – अलाबामात मोबिल शहराजवळ शस्त्रसाठ्यात स्फोट. ३०० ठार.
- १८९५ – फोर्मोसाच्या प्रजासत्ताक ची स्थापना.

### राष्ट्रीय

- २००४ – जे.एन. दीक्षित यांची राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारपदी नेमणूक.
- २००७ – पोलिसांनी अलाहाबाद येथील शंकरगढ भागातून ५० किलो अमोनियम नायट्रेट व १००० मीटर फ्यूज वायर जप्त केले.

### जन्म

- १०४८ – शेन्झाँग, चीनी स्राटचा जन्म.
- १३३४ – सुको, जपानी स्राटचा जन्म.
- १४५८ – महमुद बेगडा, गुजरातचा सुलतानचा जन्म.
- १७१३ – जॉन स्टुअर्ट, युनायटेड किंगडमचा पंतप्रधानचा जन्म.
- १८०३ – राल्फ वाल्डो एमर्सन, अमेरिकन लेखक व तत्त्वज्ञानीचा जन्म.
- १९०७ – उ नु, म्यानमारचा राजकारणीचा जन्म.

### निधन

- ०९६७ – मुराकामी, जपानी स्राटचे निधन.
- १०८५ – पोप ग्रेगोरी सातवा याचे निधन.
- १२६१ – पोप अलेक्झांडर चौथा याचे निधन.
- १५५५ – हेन्री दुसरा, नव्हारेचा राजाचे निधन.
- १९२४ – आशुतोष मुखर्जी, बंगाली शिक्षणतज्ज्ञाचे निधन.

## : SMS :

Tufani barish me raat ko shop per 1 admi pizza lene aya.. SHOPKEPER: Aap shadi shuda hain? Admi: Is tufani barish me kya meri maa muje pizza lene k lye bheje gi.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ४१.६ | २९ |
| अहमदनगर | ३९.८ | २६.४ |
| अकोला | ४५.९ | ३१.६ |
| अमरावती | ४३.६ | ३३ |
| बीड | ४५.८ | ३५.७ |
| भंडारा | ४४.६ | ३१ |
| बुलढाणा | ४१.१ | २७.८ |
| चंद्रपूर | ४५.३ | ३३.५ |
| चेन्नई | ४४.६ | ३२.८ |
| नवी दिल्ली | ४१.९ | ३०.६ |
| धुळे | ४३.१ | २९.८ |
| गोंदिया | ४२.४ | ३० |
| जळगाव | ४४.९ | ३०.७ |
| कोल्हापूर | ३५.९ | २५.२ |
| लातूर | ३९.९ | ३० |
| मुंबई | ४१.७ | ३७.२ |
| नागपूर | ४३.४ | ३०.५ |
| नांदेड | ४४.८ | ३२.७ |
| नंदूरबार | ४१ | २७.३ |
| नाशिक | ३९.३ | २५.८ |
| पुणे | ३४.९ | २४.७ |
| पंढरपूर | ४१.४ | ३०.३ |
| सातारा | ३६.९ | २५.४ |
| सांगली | ३८.१ | २५.८ |
| सोलापूर | ४२.१ | ३०.८ |
| वर्धा | ४४.९ | ३४.९ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग : काळा, अनुकूल दिशा : उत्तर
कार्यक्रमात प्रशंसा होईल. वाहन, संपत्ती इत्यादीवर खर्च होण्याची शक्यता आहे.

**तूळ :** शुभ रंग : हिरवा, अनुकूल दिशा : पश्चिम
आर्थिक निर्णयात आणि व्यापारात लाभ होण्याचे योग बनतील.

**वृषभ :** शुभ रंग : लाल, अनुकूल दिशा : पश्चिम
व्यापारात, नोकरीत धन लाभ होण्याची शक्यता आहे. मुलांच्या प्रगतीने आनंद होईल.

**वृश्चिक :** शुभ रंग : निळा, अनुकूल दिशा : उत्तर
प्रवास यशस्वी आणि आरामदायक होईल. नवीन योजनांनी कार्यास सुरवात होईल.

**मिथून :** शुभ रंग : निळा, अनुकूल दिशा : दक्षिण
कुटूंबातील विविध मुद्यांवर वैचारीकदृष्टया विरोध राहिल.

**धनू :** शुभ रंग : पांढरा, अनुकूल दिशा : दक्षिण
विचार करुन निर्णय घेणे आवश्यक आहे. संपत्ती संबंधातील कामे टाळणे हिताचे राहिल.

**कर्क :** शुभ रंग : पिवळा, अनुकूल दिशा : उत्तर
व्यापारी भागीदारीत प्रगतीचे योग आहेत. स्थायी संपत्तीत वाढ होईल.

**मकर :** शुभ रंग : गुलाबी, अनुकूल दिशा : दक्षिण
मित्र आणि भावांच्या मदतीने व्यापार विषय समस्या सोडवू शकाल.

**सिंह :** शुभ रंग : पांढरा, अनुकूल दिशा : पश्चिम
व्यक्तीगत आणि प्रणय संबंधात सुधारणा होण्याची शक्यता आहे. नोकरीत मनासारखी बदली आणि बढतीचे योग बनतील.

**कुंभ :** शुभ रंग : पिवळा, अनुकूल दिशा : उत्तर
मोठयांशी व्यवहार करताना संयम बाळगणे आवश्यक आहे.

**कन्या :** शुभ रंग : हिरवा, अनुकूल दिशा : उत्तर
जीवनसाथीच्या प्रगतीने सामाजिक प्रतिष्ठेत वाढ होईल. व्यापार–व्यवसाय चांगला चालेल.

**मीन :** शुभ रंग : पांढरा, अनुकूल दिशा : उत्तर
अधिकाऱ्यांमध्ये आपले वर्चस्व वाढेल. व्यापारी संबंधात केलेल्या तडजोडी फायदेशीर ठरतील.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ९५९



### आडवे शब्द

१. '..... जाईच्या पाकळ्यांस, दंव अजून सलते गं' (सुरेश भट)
१०. ब्र
११. हजार किलो
१२. मर्यादा, सीमा
१३. वस्ती
१५. वेशीवरचे ठाणे
१६. धपाटा
१७. तापापूर्वीचे अंग मोडून येणे
२१. आई–वडील
२६. सापाची एक विषारी जात
२७. प्रतिष्ठित, मान देण्यास योग्य असा
२९. अटीची भाषा
३०. खुंटी, मेख, चपटे निमुळते लाकूड
३२. कर्ण, कर्णेंद्रिय
३३. चांगले वर्तन
३५. नमस्कार
३७. खाणे असो की वाचणे असे हवे!
३९. शरीर
४२. डावा
४४. रसभरीत
४६. रेशमी सोवळे
४७. उगीच, नाहक
४९. हाताला धरून पायी–पायी!
५०. गोंजारणे लाडीगोडी लावणे
५३. लहान, छोटा
५४. निमग्न, गुंग
५५. मनाचा ओढा
५६. हंसासारखा एक पक्षी
५८. सोनपिवळा चाफा
६१. धुंदी, नशा
६२. स्पर्शानुसार प्रत दाखवणारा शब्द
६४. बोकड
६५. पांगापांग
६६. विविध, पुष्कळ
६८. दुजाभाव
६९. पूर्वाजन्मातील असल्यास नशीब
७०. रामदासस्वामींचा एक ग्रंथ
७१. मुसलमान
७२. डोळ्यात तेल घालून, खडा (पहारा)
७४. उंटामुळे तंबूतून हद्दपार झालेला
७५. पिकाखाली नसलेली जमीन
७६. कवेत घेणे

### उभे शब्द

१. धनगर
२. चालू कामात अडथळा आणणे याअर्थी वाक्प्रचार
३. टोळभैरवांचे ठाणे
४. तोंडदेखले
५. रम्य, नेत्रसुखद
६. शर्त, पण
७. निबर
८. भोजनाची बासनात गेलेली चांगली योजना
९. सच्छिद्र
१४. तपासणी करणारा
१८. एकरूप, रममाण
१९. मंत्रीमंडळ
२०. आईचा भाऊ
२२. टक, दृष्टी
२३. संगोपन, जपणे
२४. मऊ
२५. मेहरबानी
२८. जेव्हा
३१. अभ्रक आणि गारगोटीसाठी बोलीभाषेतील नाव
३४. गडी माणसे
३६. नारायण जोडला तर दारिद्र्य आणणारी रोकड
३८. जाळणारे, उष्ण
४०. श्रेष्ठ पुरुष
४१. अनाथ, निराश्रित
४२. वाहनांची जा–ये, मालाची ने–आण
४३. अकस्मात, अनपेक्षितरीत्या
४५. नेहमी, अखंड
४६. फूलपुडीत येणारे बिनवासाचे जाड पाकळ्यांचे रंगीत फूल
४८. बतावणी
५१. अस्थिर (संपत्ती)
५२. नाश पावणे
५३. सर्प
५७. उदारहस्ते!
५९. मासलेवाईक
६०. अजूनही हा प्रेमिकांसाठी साक्षीदार!
६१. सात आश्चर्यांमधील भारतीय 'राजमुकुट'
६२. ख्रिश्चनांसाठी सर्वोच्च धर्मगुरु
६३. रत्नजडीत माळ
६४. बीजगणिताचे अंग?
६७. कौशल्य
६८. तपस्या
६९. कुठूनही सोनेच!
७३. कुलूप, मेळ

### जम्बो शब्दकोडे क्र. ९५६ चे उत्तर

आडवे उत्तर १.एक वार पंखावरूनी फिरो तुझा हात ११.कथा १२.फाकडा १३.कमळ १५.टीकाकार १७.सालपट १९.सागरगोटे २१.रग २२.रोख २४.रट २६.नगरपाल २७.सलग २८.सरी २९.पायघोळ ३०.घर ३१.टणक ३२.दरडाविणे ३४.तप ३६.रचनाकार ४०.दसरा ४४.लचक ४५.कम ालकिमान ४८.लसलस ५१.महाकाय ५२.रवानगी ५४.हार ५५.जमणे ५७.राणी ५८.कात ५९.छान ६०.नाठी ६१.फाटक ६३.कलप्रवास ६५.बेशरम ६८.वडील ७०.हारा ७२.सकटनिकट ७३.वजीर ७६.वानवा ७७.शर ७९.वीर ८०.वसाहत ८२.कणकण ८३.रजत ८४.भान ८५.रडकथा

उभे उत्तर : १.एकटी २.कथाकार ३.रफार ४.पंक ५.खडा ६.रुमाल ७.फिकट ८.रोम ९.तुळसा १०.हावरट १४.जमीनदार १६.कागदी घोडे नाचविणे १७.साखरपुडा १८.पडेल २०.गरगट २२.नग २३.कसरत २५.सावकार २८.सकल ३२.दर ३३.विद्यालय ३५.पद ३७.चल ३८.काक ३९.इमारत ४१.सलगी ४२.रास ४३.विसर ४५.कहाणी ४६.माका ४७.नवा ४९.लहानसहान ५०.सांज ५१.मराठी ५३.नवल ५६.महेश ५८.काकडी ५९.छावा ६०.नामकरण ६२.टवटवीत ६४.प्रथा ६५.बेलाशक ६६.रस ६७.शनिवार ६९.लव ७१.रावा ७४.जीवन ७५.रसा ७६.वातड ७८.रण ८१.हर

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

# विश्वबंधुता परिवारातर्फे दोन जूनला होणार विश्वबंधुतेचा जागर

पुणे (दै. संध्या)



विश्वबंधुता साहित्य परिषदेचे संस्थापक अध्यक्ष बंधुताचार्य प्रकाश रोकडे यांच्या ७० व्या वाढदिवसानिमित्त विश्वबंधुता परिवारातील सहयोगी संस्थांच्या वतीने विश्वबंधुता दिन, रोकडे यांचे अभिष्टचिंतन, 'विश्वधर्म बंधुता' ग्रंथाचे प्रकाशन, काव्य संमेलन आणि पुरस्कार वितरण अशा पंचरंगी उपक्रमाचे आयोजन केले आहे. मंगळवार, दि. २ जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता नवी पेठेतील एस. एम. जोशी सभागृहात हा कार्यक्रम होणार असल्याची माहिती विश्वबंधुता मूल्यसंवर्धन समितीच्या अध्यक्षा प्रा. भारती जाधव व प्रकाशक मंदाकिनी रोकडे यांनी दिली.

ज्येष्ठ कवी प्रा. चंद्रकांत वानखेडे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या कार्यक्रमास अ‍ॅड. प्रार्थना सदावर्ते, डॉ. वसंत बुगडे, प्राचार्य डॉ. अरुण आंधळे, डॉ. अशोककुमार पगारिया. कादंबरीकार प्रा. शंकर आथरे आणि कवयित्री संगीता झिंजुरके यांची विशेष उपस्थिती राहील.

काव्यसंमेलनामध्ये महाराष्ट्रातील २५ नामवंत कवी सहभागी होतील. प्रसंगी १२ साहित्यिकांना 'विश्वबंधुता प्रकाशदूत' पुरस्काराने सन्मानित करण्यात येईल. जयवंत शिक्षण प्रसारक मंडळाच्या हडपसर येथील जयवंत पब्लिक स्कुलमधील विद्यार्थी व शिक्षक यांचा विशेष सहभाग असणार आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. शरयू पवार, डॉ. बंडोपंत कांबळे, डॉ. सविता पाटील, सीमा गांधी, विद्या अटक, प्रा. प्रशांत रोकडे, तुकाराम कांबळे, प्रा. सायली गोसावी आणि सुनील बोरसे यांनी विशेष पुढाकार घेतला असल्याचे त्यांनी नमूद केले.

# 'जनक' या मराठी चित्रपटाचे चित्रीकरण अवघ्या १९ दिवसांत पूर्ण!

पुणे (दै. संध्या)

गेल्या काही वर्षांत मराठी सिनेमाने स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण केली असून जागतिक स्तरावर आपला अमीट ठसा उमटवला आहे. या समृद्ध आणि आशयघन कथानकाकडे आकर्षित होऊन बॉलीवूडमधील अनेक नामांकित कलाकार आणि चित्रपट निर्माते मराठी चित्रपटसृष्टीकडे वळत आहेत. याच लाटेत सामील होऊन ज्येष्ठ बॉलीवूड चित्रपट निर्माते आणि दिग्दर्शक के. पप्पू यांचे सुपुत्र आणि दिग्गज दिग्दर्शक, निर्माते राज कंवर यांचे पुतणे, अभिषेक कंवर एका सशक्त विषयाच्या सोबतीने चित्रपटसृष्टीत पाऊल ठेवण्यासाठी सज्ज झाले आहेत.



नेहमीच्या पारंपरिक मार्गापासून दूर जाऊन त्यांनी आपल्या दिग्दर्शनाचा प्रवास बॉलीवूड चित्रपटाऐवजी मराठी चित्रपटापासून सुरू करण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या आगामी 'जनक' या मराठी चित्रपटाचे चित्रीकरण नुकतेच पुणे आणि भोरच्या सुंदर परिसरामध्ये अवघ्या १९ दिवसांच्या विक्रमी वेळेत पूर्ण झाले.

'आरटीबी फिल्म्स' या बॅनरखाली निर्मित 'जनक' चित्रपटाच्या माध्यमातून अभिषेक कंवर हे निर्माता आणि दिग्दर्शक अशा दोन्ही भूमिकांतून मराठी चित्रपटसृष्टीत भव्य पदार्पण करत आहेत. त्रिलोक सिंग राजपूत यांनी या चित्रपटाचे सह-निर्माते म्हणून काम पाहिले आहे. या चित्रपटात सायली संजीव, अविनाश नारकर, अनुष्का मनीष पिंपुतकर आणि सुरेश विश्वकर्मा यांसारख्या दिग्गज कलाकारांच्या मुख्य भूमिका आहेत. चित्रपटाची पटकथा ओंकार भस्मे, अभिषेक कंवर आणि राकेश नामदेव शिर्के यांनी मिळून लिहिली आहे. चोख नियोजन, उत्तम समन्वय आणि संपूर्ण टीमच्या अहोरात्र मेहनतीमुळे केवळ १९ दिवसांत संपूर्ण चित्रपटाचे चित्रीकरण पूर्ण करण्याचा अद्भूत पराक्रम टीमने करून दाखवला आहे.

'माझ्या दिग्दर्शनाच्या पदार्पणासाठी आघाडीच्या बॉलीवूड कलाकारांना घेऊन मोठ्या बजेटचा हिंदी चित्रपट दिग्दर्शित करण्याची संधी होती. मात्र, जनकची कथा माझ्याकडे आली, तेव्हा मला माहीत होते की मला हीच कथा निवडायची आहे आणि माझा प्रवास मराठी चित्रपटसृष्टीतूनच सुरू करायचा आहे. मला पूर्ण खात्री होती, की हे कथानक मराठी भाषा आणि संस्कृतीमध्ये अधिक प्रभावी आणि वास्तववादी वाटेल,' असे अभिषेक कंवर म्हणाले. 'जनक' हा एका अत्यंत संवेदनशील आणि विचार करायला लावणाऱ्या विषयावर आधारित असून, तो नक्कीच लोकांच्या हृदयाला स्पर्श करेल. सोशल मीडियाच्या गैरवापरामुळे एखाद्या निष्पाप व्यक्तीची कशी नाहक बदनामी होऊ शकते आणि त्याचे कौटुंबिक आयुष्य कसे उद्ध्वस्त होऊ शकते, हे दाखवून हा चित्रपट डिजिटल युगातील कठोर वास्तव प्रभावीपणे मांडतो. सत्य घटनांवर प्रेरित असलेला हा थरारक कोर्टरूम ड्रामा सर्वसामान्य जनतेला एक ठोस सामाजिक संदेश देण्याचा प्रयत्न करतो, असेही अभिषेक यांनी नमूद केले.

चित्रपटाच्या छायाचित्रणाची धुरा सुमेध मराठे यांनी सांभाळली असून, आदित्य कडतणे यांनी संगीत दिले आहे. सिद्धार्थ तातुस्कर यांनी प्रॉडक्शन डिझायनर म्हणून काम पाहिले आहे. चित्रीकरणाचा टप्पा वेगाने पूर्ण झाल्यानंतर, आता हा चित्रपट आपल्या पोस्ट प्रॉडक्शनच्या टप्प्यात प्रवेश करण्यासाठी सज्ज झाला आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### शाहीर हिंगे लोककला प्रबोधिनीच्या अध्यक्षपदी हेमंतराजे मावळे यांची निवड



पुणे (दैनिक संध्या) : शाहीर हिंगे लोककला प्रबोधिनीच्या नवीन विश्वस्त मंडळाची सन २०२६ ते २०३१ या कार्यकाळासाठी निवड जाहीर करण्यात आली. अध्यक्षपदी आचार्य शाहीर हेमंतराजे मावळे यांची निवड करण्यात आली असून उपाध्यक्षपदी शाहीर गणेशदादा टोकेकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. कार्याध्यक्ष आणि कोषाध्यक्षपदी प्रा. शाहीरा संगीता मावळे, सचिवपदी अरुणकुमार बाभुळगांवकर तसेच सहसचिवपदी अक्षदा इनामदार यांची निवड करण्यात आली. विश्वस्त सदस्य म्हणून प्रा. शाहीरा रुपाली देशपांडे, शाहीर चेतन हिंगे, होनराज मावळे आणि नंदिनी देवकर यांची निवड करण्यात आली आहे. जनसंपर्क, प्रचार व प्रसिद्धी प्रमुख प्रा.पुष्कर औरंगाबादकर आणि व्यवस्थापक सीए आदिती जोशी यांची नियुक्ती करण्यात आली. प्रबोधिनी शाहिरी क्षेत्रात अनेक वर्षांपासून सातत्याने कार्यरत असून विनामूल्य पोवाडे प्रशिक्षण, विविध सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून आपली संस्कृती, परंपरा व कलेची जोपासना करीत आहे.

### मुंबई -बंगळूर सुपरफास्ट एक्स्प्रेस सुरु

पुणे (दैनिक संध्या) : रेल्वे प्रवाशांसाठी आनंदाची बातमी असून, दक्षिण पश्चिम रेल्वेकडून एसएमव्हीटी बंगळूर – लोकमान्य टिळक टर्मिनस - एसएमव्हीटी बंगळूर द्वैसाप्ताहिक सुपरफास्ट एक्स्प्रेस सुरू करण्यात आली आहे. ही गाडी आता सांगली आणि मिरज जंक्शनमार्गे धावणार असल्याने पश्चिम महाराष्ट्रातील प्रवाशांना मुंबई आणि बेंगळुरू प्रवासासाठी मोठा दिलासा मिळणार आहे. गाडी क्रमांक १६५५३ ही एसएमव्हीटी बंगळूर – लोकमान्य टिळक टर्मिनस सुपरफास्ट एक्स्प्रेस (मंगळवार, शनिवार) नियमित सेवा प्रारंभ : २३ मे २०२६ गाडी क्रमांक १६५५४ लोकमान्य टिळक टर्मिनस – एसएमव्हीटी बंगळूर सुपरफास्ट एक्स्प्रेस(बुधवार, रविवार)नियमित सेवा प्रारंभ : २४ मे २०२६ या सुपरफास्ट गाडीला खालील स्थानकांवर थांबा देण्यात आला आहे : तुमकूर, दावणगेरे, एसएसएस हुबळी, धारवाड, बेळगाव, मिरज जंक्शन, सांगली, कराड, सातारा, लोणंद, पुणे, लोणावळा, कर्जत, कल्याण आणि ठाणे. गाडी बंगळूरहून रात्री ८.३५ वाजता सुटेल. त्यानंतर तुमकुरू १०.१५, दावणगेरे १.२५, हुबळी ३.४०, धारवाड ४.०५, बेळगाव ६.५०, मिरज १०.५०, सांगली ११.०५, कराड १२.०५, सातारा १.१०, लोणंद २.२०, पुणे ४.५५, लोणावळा ५.५५, कर्जत ६.४०, कल्याण ७.३०, ठाणे ७.५५ आणि लोकमान्य टिळक टर्मिनस, मुंबई येथे रात्री ८.४० वाजता आगमन होईल. परतीच्या प्रवासात गाडी लोकमान्य टिळक टर्मिनसहून रात्री ११.१५ वाजता सुटेल. त्यानंतर ठाणे ११.३०, कल्याण १२.०५, कर्जत १.००, लोणावळा १.५५, पुणे ३.०५, लोणंद ४.४५, सातारा ६.००, कराड ६.५५, सांगली ८.२५, मिरज ९.३०, बेळगाव ११.५५, धारवाड १.५५, हुबळी २.४०, दावणगेरे ४.२२, तुमकूर ८.०५ आणि बंगळूर येथे रात्री १०.३० वाजता पोहोचेल.

# शेती विकून मिळालेले २० लाख गुंतवणुकीत बुडाले

पुणे (दै. संध्या)

शेती विकून आलेले पैसे गुंतवा त्यावर दरमहा २० टक्के परतावा मिळेल. असे आमिष दाखवत एका महिलेची तब्बल २० लाख रुपयेची फसवणूक केल्याचा प्रकार लोणी काळभोर परिसरात उघडकीस आला आहे. सुरुवातीला काही महिन्यांचा परतावा देऊन विश्वास संपादन करण्यात आला, परंतु त्यानंतर लाखो रुपये बुडाल्याच्या आर्थिक तणावातून फिर्यादी महिलेच्या पतीचा मृत्यू झाला आहे.

याप्रकरणी पुनम प्रमोद पवार (वय ५०, सध्या रा. पिंपरी, पूर्वी रा. कुशलवाटिका सोसायटी, लोणी काळभोर) यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून अतुल शामराव पवार ( रा. नांदवळ, ताकोरेगाव, जि. सातारा) आणि संतोष सुरेश काकडे (रा. स्वप्नपुर्ती पार्क, राहींजवस्ती, लोणी काळभोर ता. हवेली जि. पुणे) यांचेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी पुनम पवार या ऑनलाईन पुरणपोळीच्या ऑर्डरचा व्यवसाय करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. सन २०२० मध्ये त्या आणि त्यांच्या पतीने चार एकर शेती विकून सुमारे २० लाख रुपये मिळवले होते. ही माहिती गावातीलच ओळखीचे असलेले अतुल पवार याला होती. त्यानंतर अतुल पवार आणि त्याची पत्नी यांनी पुनम पवार यांच्या घरी जाऊन गुंतवणुकीचा प्रस्ताव मांडला.

# भगवंत पाहतो या विश्वासातूनच आत्मनियंत्रण निर्माण होते

पुणे (दै. संध्या)

■ प.पू. गाणपत्य विद्यावाचस्पती स्वानंद पुंड शास्त्री महाराज

■ श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टच्या वतीने श्री गणेश गीतेतील 'भक्तीयोगा'वर प्रवचनमालेचा सहावा दिवस



मोरयाला असंख्य नेत्र आहेत. ज्याला असंख्य नेत्र असतात त्याला सगळे कळते. मग खोलीत कोणी असो की नसो, सीसीटीव्ही असो की नसो, मी व्यवस्थित वागतो; कारण माझा मोरया पाहतोय याच्यावर विश्वास असायला हवा. जोपर्यंत 'भगवान पाहतो' याच्यावर विश्वास होता, तोपर्यंत सीसीटीव्हीची गरज नव्हती. आता ती आली; कारण तो विश्वास उडाला आणि त्याला बुद्धिवादाची उपमा देण्यात आली. स्वर्ग असो की नरक, पाप असो की पुण्य यापेक्षा हे आत्मनियंत्रणाचे शास्त्र आहे, असे प्रतिपादन प.पू. गाणपत्य विद्यावाचस्पती स्वानंद पुंड शास्त्री महाराज यांनी केले.

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट आणि सुवर्णयुग तरुण मंडळाच्या वतीने आयोजित प्रवचनमालेत यवतमाळ-वणी येथील प.पू. गाणपत्य विद्यावाचस्पती स्वानंद पुंड शास्त्री महाराज यांनी श्री गणेश गीतेतील भक्तीयोगावर सहाव्या दिवशी निरूपण केले. श्रीमंत थोरले बाजीराव रस्त्यावरील नू. म. वि. प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाच्या सभागृहात ही प्रवचनमाला सुरू आहे. अधिकमासाच्या पावन मुहूर्तावर भगवान श्री गणेशांच्या भक्तीचा मार्ग प्रशस्त करणारा श्री गणेश गीतेतील भक्तीयोग गणेशभक्तांसमोर मांडण्यासाठी प्रवचनमालेचे आयोजन करण्यात आले आहे.

प.पू. गाणपत्य विद्यावाचस्पती स्वानंद पुंड शास्त्री महाराज म्हणाले, 'भगवंताला असंख्य नेत्र आहेत. मोरयाच्या हातात कोटी सूर्यांप्रमाणे तेजस्वी आयुधं आहेत. प्रत्येक आयुधाला वेगळी छटा आहे. मोरयाच्या हातात फक्त शस्त्र नाहीत, तर अर्थपूर्ण आयुधं आहेत. शस्त्र विनाशासाठी असतात, तर आयुध ही निर्मितीसाठी असतात.' ते पुढे म्हणाले, 'भगवंताचे वैभव समजून घेतले पाहिजे. जगातील प्रत्येक जीव वेगळा आहे ; मात्र मोरयाचे वैशिष्ट्य असे आहे की, तो पारंपरिक सौंदर्याच्या नियमांत बसत नाही. इतर देवतांना विशिष्ट रूपांच्या मर्यादा असतात. परंतु मोरयाला कोणतेही निश्चित रूप नसल्यामुळे तो प्रत्येक रूपात अनुभवता येतो.

# अक्षरांमधून लेखकांचा वाचकांशी संवाद : डॉ. वर्षा तोडमल

पुणे (दै. संध्या)

आताच्या काळात सर्व प्रकारचे तंत्रज्ञान उपलब्ध आहे. मात्र, पूर्वीच्या काळी संदर्भ ग्रंथ मिळवून अभ्यास करणे आणि त्याआधारे साहित्य निर्मिती करणे हे कठीण होते. तरी देखील त्या काळातही अनेक लेखक व शिक्षिकांनी अभ्यास करून पुस्तके लिहिली. लेखक हे अक्षरांमधून वाचकांशी संवाद साधत असत, असे मत प्रख्यात लेखिका व विचारवंत डॉ. वर्षा तोडमल यांनी व्यक्त केले. सदाशिव पेठेतील श्री गोपाळ हायस्कूलच्या माजी प्राचार्या डॉ.पुष्पा लिमये लिखित 'विविधा' पुस्तकाचे प्रकाशन सारसबागेजवळील वेदशास्त्रोत्तेजक सभा येथे आयोजित कार्यक्रमात झाले. यावेळी ज्येष्ठ संपादक डॉ. आनंद हर्डीकर, लेखिका डॉ.पुष्पा लिमये व्यासपीठावर उपस्थित होते. डॉ. धर्मेंद्र शाह, खाजा शेख यांसह माजी विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाच्या




नियोजनात सहभाग घेतला. डॉ. वर्षा तोडमल म्हणाल्या, साहित्य, संस्कृती, इतिहास, आत्मचरित्र असा बहुरंगी भाग या पुस्तकात वाचनास मिळतो. साहित्याच्या अनेक आशयधारा यानिमित्ताने एकाच पुस्तकात आल्या आहेत. प्रत्येक लेख हा चिंतनाचा नवा सेतू असून मराठी लेखन परंपरेचे समृद्ध चिंतन डॉ.पुष्पा लिमये यामाध्यमातून केले आहे. डॉ. आनंद हर्डीकर म्हणाले, विविध लेखनप्रकारांचे संकलन या पुस्तकात पाहायला मिळते. लेखनकलेच्या प्रतिभेचे दर्शन देणारी ही साहित्यनिर्मिती असून डॉ.लिमये यांच्यासारख्या अष्टपैलू व्यक्तिमत्वाचे दर्शन वाचकांना घडत आहे. डॉ.पुष्पा लिमये म्हणाल्या, विविधा या पुस्तकातील लेख ३० ते ३५ वर्षांपूर्वीचे किंवा त्याही पेक्षा आधीचे आहे. अनेक मासिके व नियतकालिके यामधून हे प्रसिद्ध झाले आहेत. त्यावेळेची परिस्थिती, अवतीभवतीच्या वातावरण, काही प्रसंग, प्रासंगिक प्रश्न, बातम्या याबद्दलच्या प्रतिक्रिया लेखातून उमटल्या आहेत. अशा लेखनापैकी प्रातिनिधीक लेखन हे विविधा त अवतरले असल्याचे त्यांनी सांगितले. विनया देव यांनी सूत्रसंचालन केले. तारा गोपिनाथ यांनी आभार मानले.

# पुजाऱ्याच्या डोळ्यांदेखत चांदीचा मुकुट पळवला

पुणे (दै. संध्या)

पुणे जिल्ह्यातील तळेगाव दाभाडे परिसरात चोरीची एक अत्यंत विचित्र आणि धक्कादायक घटना उघडकीस आली आहे, ज्यामुळे पोलीस आणि सर्वसामान्य नागरिकही अवाक् झाले आहेत. सुप्रसिद्ध तुळजाभवानी देवी मंदिरात, एका चलाख चोराने अत्यंत कल्पकतेने चोरीचा हा डाव साधला. या घटनेला खरोखरच धक्कादायक बनवणारी गोष्ट म्हणजे, चोरी करण्याच्या अगदी आधी, त्या चोराने हात जोडून देवीकडे रीतसर माफी मागितली; आणि त्यानंतर, लाखो रुपये किमतीचा चांदीचा मुकुट घेऊन त्याने तिथून पळ काढला. या संपूर्ण घटनेचे दृश्य मंदिरात बसवण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमध्ये कैद झाले आहे. आरोपी चोर एका भाविकाचे सोंग घेऊन, देवीचे दर्शन घेण्याच्या उद्देशाने मंदिरात शिरला. आपली ओळख पूर्णपणे लपवून ठेवण्यासाठी, त्याने चेहऱ्यावर मास्क आणि डोक्यावर टोपी घातली होती. मंदिरात प्रवेश केल्यानंतर, त्याने अत्यंत शांत आणि भक्तिपूर्ण मुद्रेने देवीची प्रार्थना करण्यास सुरुवात केली. त्याच्या हातात एक नारळ होता आणि, असीम श्रद्धा व्यक्त करत, त्याने देवीला कुंकूही लावले. त्याच्या या "भक्तीचा" देखावा पाहून, तिथे उपस्थित असलेल्या मंदिराच्या पुजाऱ्याला त्या चोराबद्दल यत्किंचितही संशय आला नाही. पुजाऱ्याच्या या गाफीलपणाचा फायदा घेत, त्या चोराने आपले खरे रूप दाखवून दिले. ज्या क्षणी पुजाऱ्याचे लक्ष किंचित विचलित झाले आणि त्यांनी आपली मान दुसरीकडे वळवली, त्याच क्षणी आरोपीने गर्भगृहात ठेवलेला सुमारे एक किलो वजनाचा चांदीचा मुकुट चपळाईने उचलला.

# पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी व्यापक चळवळीची गरज

## संजय आवटे यांचे प्रतिपादन; ग्रीन सोल्युशन्सतर्फे डॉ. प्रसाद जोशी, आरती भोसले यांचा सन्मान

पुणे (दै. संध्या)


"पर्यावरणाचे रक्षण ही केवळ शासनाची किंवा काही संस्थांची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. निसर्ग टिकला तरच मानवजातीचे भविष्य सुरक्षित राहील. त्यामुळे निसर्गाप्रती प्रत्येकाने संवेदनशील भावनेतून योगदान देत पर्यावरण संवर्धनाचे काम करावे," असे प्रतिपादन ज्येष्ठ अभिनेते व 'नाम' फाउंडेशनचे सहसंस्थापक मकरंद अनासपुरे यांनी केले. 'मेट्रो आणि मित्रो' म्हणजे विकास नव्हे, तर पर्यावरणाचा समतोल राखत समाजाचे जीवन सुसह्य होईल, असा विकास गरजेचा आहे. त्यासाठी व्यापक चळवळ उभारायला हवी, असे ज्येष्ठ संपादक व पत्रकार संजय आवटे यांनी नमूद केले.

प्रदूषण नियंत्रण व पर्यावरण संवर्धन क्षेत्रात जगभर कार्यरत ग्रीन सोल्युशन्स संस्थेच्या १४ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यात अनासपुरे बोलत होते. संस्थेच्या वतीने दिला जाणारा जीवनगौरव पुरस्कार यंदा फलटण येथील ज्येष्ठ अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. प्रसाद जोशी यांना अनासपुरे व ज्येष्ठ संपादक संजय आवटे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. तसेच भारत-नॉर्वे ग्रीन स्ट्रॅटेजिक पार्टनरशिप समिटमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उद्योग प्रतिनिधी मंडळात निवड झाल्याबद्दल ग्रीनएक्स एन्व्हायर्नमेंटलच्या संस्थापिका आरती भोसले-अहिवळे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे निवृत्त प्रादेशिक अधिकारी एल. एस. भड व निवृत्त उपप्रादेशिक अधिकारी किशोर केर्लीकर यांनाही गौरविण्यात आले.

बालेवाडी येथील हॉटेल ऑर्चिड येथे आयोजित कार्यक्रमावेळी ग्रीन सोल्युशन्सचे संस्थापक सागर अहिवळे, प्रशांत गायकवाड, अहिवळे यांच्या आई सुषमा अहिवळे, वडील चंद्रकांत अहिवळे, आरती यांचे वडील भीमराव भोसले यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. अहिवळे दाम्पत्याच्या यशाबद्दल दानोळी ग्रामस्थांच्या वतीने सन्मान करण्यात आला.

मकरंद अनासपुरे म्हणाले, "ग्रीन सोल्युशनच्या माध्यमातून निसर्ग संवर्धनासाठी उल्लेखनीय कार्य होत आहे. आज केवळ प्रदूषण कमी करणे पुरेसे नसून, समाजातील नकारात्मकता कमी करून संवेदनशीलता आणि सामाजिक जबाबदारी वाढवणेही तितकेच महत्त्वाचे आहे. वाढते तापमान, अनियमित पाऊस आणि पर्यावरणीय असंतुलन पाहता पर्यावरणपूरक उपक्रमांची गरज अधिक अधोरेखित झाली आहे. पर्यावरण संरक्षण ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी असून, सुशिक्षित समाजाने जनजागृतीसाठी पुढाकार घेणे आवश्यक आहे."

संजय आवटे म्हणाले, "दानोळीसारख्या छोट्या गावातील मुलगी नॉर्वेसारख्या देशात जाऊन स्वतःचा आणि देशाचा झेंडा अभिमानाने फडकवते, ही ग्रामीण भागातील जिद्द, क्षमता आणि स्वप्नांच्या ताकदीची प्रेरणादायी कहाणी आहे. ग्रीन सोल्युशन ही केवळ कंपनी नसून, सामाजिक आणि पर्यावरणीय चळवळ आहे. विकासाच्या नावाखाली निसर्गावर अन्याय होत असून, जंगलतोड, प्रदूषण, पाण्याची कमतरता आणि वाढते तापमान ही गंभीर समस्या बनली आहे. खरा विकास म्हणजे सुरक्षित पर्यावरण आणि निसर्गाशी संतुलन राखणे होय."




आरती भोसले म्हणाल्या, "माणूस कोणत्या परिस्थितीतून आला, यापेक्षा तो समाजासाठी काय निर्माण करतो, हे अधिक महत्त्वाचे असते. संघर्षातून स्वतःची ओळख निर्माण करणे, हेच खरे यश आहे. माझ्या प्रवासात वडिलांचे संस्कार आणि सागर यांची खंबीर साथ हीच माझी मोठी ताकद ठरली. छोट्या गावातून मोठी स्वप्ने पाहताना ग्रामस्थांचा पाठिंबा आणि विश्वासही प्रेरणादायी ठरला."

सागर अहिवळे म्हणाले, "ग्रीन सोल्युशनच्या १४ वर्षांच्या प्रवासात अनेक संघर्ष, अडचणी आणि आव्हानांचा सामना केला; मात्र निसर्ग संवर्धन आणि सामाजिक बांधिलकीच्या ध्येयापासून कधीही मागे हटलो नाही. आज ही संस्था केवळ कंपनी न राहता सामाजिक विचारधारा आणि पर्यावरणीय चळवळ बनली आहे. पर्यावरण संरक्षण आणि समाजजागृतीच्या माध्यमातून सकारात्मक बदल घडवण्याचा आमचा सातत्याने प्रयत्न सुरू आहे."

डॉ. प्रसाद जोशी म्हणाले, "सागर आणि आरती यांचा प्रवास अत्यंत संघर्षमय आणि प्रेरणादायी आहे. अथक परिश्रम, सातत्य आणि समाजासाठी काहीतरी करण्याची तळमळ यामुळेच त्यांनी ग्रीन सोल्युशनची यशस्वी उभारणी केली. पर्यावरण संरक्षण ही केवळ मोहिम नसून ती सामाजिक जबाबदारी आहे. लोकांना निसर्गाशी जोडण्याचे आणि सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव करून देण्याचे मोठे कार्य त्यांनी केले आहे." याप्रसंगी ग्रीन सोल्युशन्सच्या वतीने प्रदूषण नियंत्रण, पर्यावरण क्षेत्रात कार्यरत अधिकारी, कार्यकर्त्यांचा सन्मान करण्यात आला. किशोर केर्लीकर यांनी मनोगत व्यक्त केले. दीपक म्हस्के व दीप्ती हलवाई यांनी सूत्रसंचालन केले. दिग्विजय राऊत यांनी स्वागत केले. प्रशांत गायकवाड यांनी आभार मानले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### सुवर्णदीप रेसिडेन्सीमधील अनधिकृत बांधकामावर कारवाई फक्त व्हॉट्सअॅपवरच?

पिंपरी चिंचवड (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या 'ब' क्षेत्रीय कार्यालयाचा अजब कारभार समोर आला असून, प्रत्यक्ष जागेवर कारवाई न करता केवळ वरिष्ठ अधिकारी आणि तक्रारदारांच्या डोळ्यात धूळ फेकण्याचे काम सुरू आहे. चिंचवड येथील 'सुवर्णदीप रेसिडेन्सी' मधील अनधिकृत आणि वाढीव बांधकाम हटवण्याऐवजी केवळ कागदोपत्री 'कारवाईचा खेळ' सुरू असल्याचा संताप तक्रारदार सुवर्णा दिलीप पाटील यांनी थेट महानगरपालिका आयुक्त डॉ विजय सूर्यवंशी यांना पाठवलेल्या पत्रात व्यक्त केला आहे. पाटील यांनी मिडीयाला प्रतिक्रिया देताना सांगितले की,सुवर्णदीप रेसिडेन्सीमधील बेकायदेशीर बांधकामाविरोधात जुलै २०२५ पासून सातत्याने तक्रारी, ई-मेल आणि अधिकाऱ्यांच्या भेटीगाठी घेतल्या जात आहेत. दरम्यान, २३ मार्च २०२६ रोजी क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी एक ई-मेल पाठवून ११ फेब्रुवारी २०२६ रोजी पोलीस बंदोबस्तात सदर बांधकामावर कारवाई करण्यात आली असून त्याचे फोटो व्हॉट्सअॅपवर पाठवले आहेत असा दावा केला होता.जर ११ फेब्रुवारीला खरोखरच कारवाई झाली, तर १३ ऑक्टोबर २०२५ रोजी अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून जे अनधिकृत बांधकाम दाखवले होते, ते आजही जसेच्या तसे कसे उभे आहे? मग व्हॉट्सअॅपवर पाठवलेले फोटो नेमके कोणत्या इमारतीचे आहेत. हा निव्वळ दिखाऊपणा वरिष्ठ अधिकाऱ्यांना दाखवण्यासाठी सुरू आहे का? की आमच्या मनाची समजूत घालण्यासाठी? अशी बनवेगिरी क्षेत्रीय अधिकाऱ्यांना शोभते का? गेल्या नऊ महिन्यांपासून सातत्याने पाठपुरावा करूनही बांधकाम परवाना विभाग आणि क्षेत्रीय कार्यालय केवळ टाळाटाळ करत आहे.तसेच विकासकाने भोगवटा पत्रातील अटीची पूर्तता केलेली नाही. या संपूर्ण प्रकरणात मोठ्या प्रमाणावर 'अर्थकारण' दडले आहे. त्यामुळे आयुक्त यांनी स्वतः या प्रकरणात गांभीर्याने लक्ष घालून, संबंधित दोषी क्षेत्रीय अधिकारी आणि बांधकाम परवाना विभागाच्या अधिकाऱ्यांवर तत्काळ कडक कारवाई करावी, तसेच सुवर्णदीप रेसिडेन्सीमधील ते अनधिकृत बांधकाम प्रत्यक्ष काढून टाकण्याचे आदेश द्यावेत.आता या 'व्हॉट्सअॅप बहाद्दर' अधिकाऱ्यांवर पालिका आयुक्त काय अॅक्शन घेतात, याकडे चिंचवडकरांचे लक्ष लागले असल्याचे मत तक्रारदाराचे पती दिलीप पाटील यांनी व्यक्त केले आहे.

### वाढलेल्या मागणीमुळे इंडियनऑइलचे रविवारीही डेपो सुरु

मुंबई (दैनिक संध्या) : महाराष्ट्रातील विविध भागांमध्ये इंधनाच्या मागणीत झालेल्या वाढीच्या पार्श्वभूमीवर इंडियनऑइलने रविवारीही आपल्या डेपो आणि टर्मिनलचे कामकाज सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. सामान्यतः साप्ताहिक सुट्टी असतानाही पेट्रोल, डिझेल आणि एलपीजीचा अखंडित पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी ही विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. इंडियनऑइलकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार, महाराष्ट्रातील अकोला, चंद्रपूर, मनमाड, वाशी, मिरज, अहिल्यानगर आणि सोलापूर येथील डेपो व टर्मिनल रविवारी कार्यरत ठेवण्यात आले आहेत. वाढलेल्या मागणीला तातडीने प्रतिसाद देण्यासाठी लॉजिस्टिक्स आणि वितरण व्यवस्थेवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. इंधन साठ्याची स्थिती सातत्याने तपासली जात असून पुरवठा पथके, वाहतूक नेटवर्क, टर्मिनल ऑपरेशन्स तसेच निवडक रिटेल आऊटलेट्स २४ तास कार्यरत ठेवण्यात आले आहेत. “We are always There” या भावनेनुसार ग्राहकांना कोणतीही अडचण भासू नये, यासाठी इंडियनऑइल प्रयत्नशील असल्याचे कंपनीने स्पष्ट केले. दरम्यान, नागरिकांनी घाबरून जाऊन अनावश्यक मोठ्या प्रमाणात इंधन खरेदी करू नये, असे आवाहनही कंपनीने केले आहे. इंधन उपलब्धतेसंदर्भातील माहिती मिळविताना ग्राहकांनी केवळ अधिकृत संस्था आणि इंडियनऑइलकडून जारी करण्यात येणाऱ्या अधिकृत माहितीलाच विश्वास ठेवावा, असेही कंपनीने नमूद केले आहे.

### नवविवाहित जोडप्यांशी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी साधला संवाद

बोईसर (दैनिक संध्या) : शिवसेनेच्या वतीने पालघर जिल्ह्यातील आदिवासी युवक युवतींचा सामूहिक विवाह सोहळा गेली अनेक वर्षे आयोजित केला जातो. यावर्षी या सोहळ्याला प्रत्यक्ष उपस्थित राहू न शकल्याने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांना व्हिडीओ कॉल करून त्यांच्याशी संवाद साधला. यावेळी बोलताना, बोईसरमधील शिवसेना आदिवासी समाज विभाग आणि आधार प्रतिष्ठान यांच्यावतीने दरवर्षी बोईसर मध्ये या सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात येते. यावर्षी या सोहळ्यात सहभागी होऊन लग्न केलेल्या नवरी आणि नवरदेवाने कायम सुखा समाधानाने नवीन आयुष्याला सुरुवात करावी अशा शुभेच्छा देतो असे शिंदे यांनी सांगितले. आजच्या या सामुदायिक विवाह सोहळ्यात 201 आदिवासी जोडप्यांचा विवाह संपन्न होत आहे ही अत्यंत आनंदाची आणि समाधानाची बाब असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. मला या सोहळ्याला प्रत्यक्षात उपस्थित राहून तुम्हा सर्वांना भेटायचे होते मात्र, काही कारणामुळे मला माझा हा नियोजित दौर रद्द करावा लागला. म्हणून मी तुमच्याशी या व्हीडीओच्या माध्यमातून संवाद साधत असल्याचे शिंदे यांनी यावेळी सांगितले. मंडपात जेवढ्या नववधू आहेत त्या सर्व माझ्या लाडक्या बहीणी आहेत. त्यामुळे हे माझ्या घरातलाच लग्नसोहळा आहे. त्याचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल शिवसेनेचे उपनेते आदिवासी समाज महाराष्ट्र संघटक आणि आधार प्रतिष्ठानचे अध्यक्ष जगदीश धोडी, सह संपर्क प्रमुख आणि आधार प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष वैभव संखे आणि शिवसेनेच्या सर्व स्थानिक पदाधिकाऱ्यांना धन्यवाद देतो असे शिंदे यांनी यावेळी बोलताना सांगितले. वेगवेगळे सामाजिक उपक्रम राबवणे हे शिवसेनेच्या रक्तातच आहेत.आजचा हा सामुहिक विवाह सोहळा त्याचेच प्रतिक आहे.लग्न कार्यासाठी अनेक जण कर्ज काढतात. जमीन गहाण ठेवतात. हे कर्ज फेडता फेडता वधू पित्याचं कंबरडं मोडतं. मात्र या गोरगरीबांना सहाय्य करण्यासाठी शिवसेनेसह पालघरमधील सामाजिक संस्थांनी भव्य सामुदायिक विवाह सोहळा आयोजित केलाय. हा सोहळा तुम्ही त्यांना वैवाहिक आयुष्यात लागणारे सर्व साहित्य देता, तसेच सर्व विधी पार पाडून घरातील सदस्यांप्रमाणे त्यांचे लग्न लावून देता, यानिमित्ताने सगळे आमदार, खासदार पदाधिकारी आवर्जून उपस्थित राहता हे खरोखरच कौतुकास्पद असल्याचे मत व्यक्त केले.

### पुण्यातील बुधवार पेठेत छापा; सहा बांगलादेशी महिला ताब्यात

पुणे (दैनिक संध्या) : शहरातील फरासखाना आणि खडक पोलिसांनी शनिवारी मध्यरात्री संयुक्त मोहीम राबवून बुधवार पेठेतील सागर इमारतीवर छापा टाकला. पोलिसांनी या कारवाईत बेकायदा वास्तव्य करणाऱ्या सहा बांगलादेशी महिलांना ताब्यात घेतले आहे. परिमंडळ एकचे पोलिस उपायुक्त ऋषिकेश रावले यांना बुधवार पेठ परिसरात काही बांगलादेशी महिला बेकायदा राहत असल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी सागर इमारतीवर छापा टाकला. पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या महिलांकडे चौकशी केली असता धक्कादायक माहिती समोर आली आहे. सुरुवातीला ब्युटी पार्लर, शिवणकाम किंवा घरकामाचे आमिष दाखवून भारतात आणले होते, असे या महिलांनी सांगितले.

# बदलापूर प्रकरणातील पीडित भगिनींच्या शिक्षणाचा खर्च शासनामार्फत

**शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांचा विशेष पुढाकार**



**मुंबई (दै. संध्या) :**

बदलापूर (जिल्हा ठाणे) येथील दुर्दैवी घटनेतील दोन्ही अल्पवयीन पीडित मुलींना (निर्भया क्र. १ व निर्भया क्र. २) सामाजिक-शैक्षणिक आधार देण्यासाठी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने एक अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

या दोन्ही मुलींच्या इयत्ता १० वी पर्यंतच्या शैक्षणिक प्रवेश शुल्काचा संपूर्ण खर्च 'एक वेळची विशेष बाब' म्हणून पूर्णपणे शासनामार्फत अदा करण्यात येणार आहे. शालेय शिक्षण मंत्री श्री. दादाजी भुसे यांच्या विशेष पुढाकारामुळे हा निर्णय तातडीने मार्गी लागला असून, नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापूर्वीच पीडित कुटुंबांना हा मोठा दिलासा मिळाला आहे.तसेच यापुढे अशाच घटनांच्या बाबतीत शासनामार्फत कायमस्वरूपी मदतीबाबत देखील शासन निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचारार्थ आहे.

महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने १४ मे २०२६ रोजी या संदर्भातील अधिकृत शासन निर्णय (GR) जारी केला आहे. माहे ऑगस्ट २०२४ मध्ये बदलापूर येथील एका शाळेत घडलेल्या या अत्यंत अनुचित घटनेनंतर, पीडित मुलींच्या इयत्ता १ ली ते १० वी पर्यंतच्या शैक्षणिक प्रवेशाचा खर्च शासनस्तरावरून करण्यात येणार आहे. यानुसार निर्भया क्र. १ चे इयत्ता १ ली ते इयत्ता १० वी पर्यंतचे संपूर्ण प्रवेश शुल्क शासन भरणार आहे. तसेच

निर्भया क्र. २ चे प्रलंबित असलेले सिनिअर के.जी. चे शुल्क आणि इयत्ता १ ली ते १० वी पर्यंतचे सर्व प्रवेश शुल्क शासनामार्फत अदा केले जाणार आहे.

हा संपूर्ण खर्च 'बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९' (RTE) अंतर्गत थेट संबंधित शाळांना त्या-त्या शैक्षणिक वर्षामध्ये वर्ग करण्यात येणार आहे.

या निर्णयाबाबत बोलताना शालेय शिक्षण मंत्री श्री. दादाजी भुसे म्हणाले, "बदलापूरची घटना ही अत्यंत दुर्दैवी आणि संपूर्ण समाजाला वेदना देणारी होती. त्या निष्पाप मुलींना केवळ कायदेशीर न्याय मिळवून देणे एवढेच आमचे कर्तव्य नाही, तर त्यांचे भविष्य सुरक्षित करणे ही देखील आमची सामाजिक जबाबदारी आहे. त्यांच्या पालकांवर शिक्षणाचा कोणताही आर्थिक भार पडू नये, यासाठी आम्ही तातडीने हा शासन निर्णय निर्गमित केला आहे. या दोन्ही लेकींनी कोणतीही चिंता न करता आपले शिक्षण पूर्ण करावे, शासन त्यांच्या पाठीशी एका पालकाच्या भूमिकेतून खंबीरपणे उभे आहे."

या प्रक्रियेत पीडित कुटुंबाला कोणत्याही प्रशासकीय त्रासाला सामोरे जावे लागू नये, यासाठी निधी वितरणाची पद्धत अत्यंत सुटसुटीत ठेवली गेली आहे. ठाणे जिल्हा परिषदेचे संबंधित प्राथमिक शिक्षणाधिकारी या शुल्काबाबतचा प्रस्ताव शिक्षण संचालक (प्राथमिक), पुणे यांच्याकडे सादर करतील. शिक्षण संचालकांकडून मंजुरी मिळताच हे शुल्क थेट संबंधित शाळांना अदा करण्याची कार्यवाही जिल्हा परिषद शिक्षणाधिकाऱ्यांमार्फत केली जाईल. राज्य शासनाने घेतलेल्या या संवेदनशील निर्णयाचे सर्व स्तरांतून स्वागत होत असून, यामुळे पीडित मुलींच्या सुरक्षित आणि उज्ज्वल भविष्यासाठी शासनाच्या वतीने एक भक्कम पाया रचला गेला आहे.

## ११ वर्षीय बालकास पुन्हा चालायला शिकण्यासाठी मिळाली मदत

**मुंबई (दै. संध्या) :**

काही मुलांसाठी चालणे ही सहज जमून जाणारी गोष्ट नसते, तर त्यासाठी त्यांना दररोज प्रयत्न करावे लागतात. नारायणा हेल्थ एसआरसीसी चिल्ड्रन्स हॉस्पिटल, मुंबई येथे स्पास्टिक डायप्लेजिक सेरेब्रल पाल्सीने ग्रस्त ११ वर्षांच्या मुलावर एकाच सत्रात पार पडलेली मिनिमली इन्व्हेजिव्ह प्रक्रिया पार पाडण्यात आली, ज्यामुळे त्याच्या हालचालींमधील ताण हलका झाला व त्याचे चालणे नैसर्गिक चालण्याच्या पद्धतीच्या जवळपास पोहोचण्यास मदत झाली. नारायणा हेल्थ एसआरसीसी चिल्ड्रन्स हॉस्पिटल, मुंबईच्या पीडीअॅट्रिक विभागाचे सीनिअर कन्सल्टन्ट डॉ. तरल नागदा यांच्या नेतृत्वाखाली ही प्रक्रिया पार पाडण्यात आली. अगस्त्यची कहाणी अनेक वर्षांपासून हळूहळू उलगडत होती, त्याच्या आजाराची लक्षणे इतकी सूक्ष्म होती की, केवळ त्याच्या खूप जवळच्या माणसांनाच ती खऱ्या अर्थाने लक्षात येऊ शकली असती. तो सातव्या महिन्यात जन्मलेला अपुऱ्या वाढीचा मुलगा होता व जन्माच्या वेळी त्याचे वजन १९०० ग्रॅम इतके होते. त्याने आपले सुरुवातीचे दिवस एनआयसीयूमध्ये घालवले, जिथे त्याला त्याच्या सुरुवातीच्या प्रकृतीमधून सावरणे यावरच सारा भर होता. जसजसे त्याचे वय वाढत गेले, तसतसा तो आपल्या वाढीचे टप्पे गाठत गेला खरा, मात्र काहीशा विलंबाने. त्याने इतर बहुतांश बाळांच्या तुलनेत थोडी उशीराच मान सावरली, थोड्या उशीरानेच तो बसायला शिकला आणि तो तीन वर्षांचा झाला तेव्हा कुठे पहिल्यांदा स्वतंत्रपणे पावले उचलू लागला. अर्थात या विलंबामुळे त्याचे व्यक्तिमत्त्व त्याच्यापासून हिरावले गेले नाही – त्याचे बोलणे, ऐकणे आणि दृष्टी हे सारे पूर्णपणे सामान्य होते, तो शाळेत गेला, शिकला आणि इतर कोणत्याही मुलांप्रमाणेच इतर मुलांमध्ये मिसळला.

# बालभवन नूतनीकृत इमारत लोकार्पण सोहळा

*शिक्षण मंत्र्यांकडून आज पूर्वतयारीचा व महत्वपूर्ण कामाचा सखोल आढावा*

**मुंबई (दै. संध्या) :**

मुंबईतील चर्नी रोड येथील ऐतिहासिक वारसा लाभलेल्या 'महाराष्ट्र राज्य जवाहर बालभवन' या संस्थेच्या नूतनीकृत इमारतीचा भव्य लोकार्पण सोहळा उद्या (२५ मे) संपन्न होत आहे. या पार्श्वभूमीवर राज्याचे शालेय शिक्षण मंत्री मा. श्री. दादाजी भुसे यांनी आज बालभवन संस्थेस प्रत्यक्ष भेट देऊन कार्यक्रमाच्या पूर्वतयारीचा आणि विविध कामकाजाचा सखोल आढावा घेतला. उद्याचा सोहळा अत्यंत देखणा आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडण्यासाठी त्यांनी प्रशासनाला महत्वपूर्ण सूचना केल्या.



उद्या संपन्न होणारा हा लोकार्पण सोहळा राज्याचे माननीय मुख्यमंत्री महोदय यांच्या शुभहस्ते आणि माननीय उपमुख्यमंत्री महोदय यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडणार आहे. कार्यक्रमाचे महत्त्व लक्षात पाहता शिक्षण मंत्र्यांनी आज स्वतः बालभवनच्या नूतनीकृत इमारतीची पाहणी केली. यामध्ये तळमजल्यावरील अत्याधुनिक प्रेक्षागृह , पहिल्या मजल्यावरील नृत्य दालन, नाट्य कक्ष आणि संगीत कक्ष, तसेच दुसऱ्या मजल्यावरील सादरीकरण व्यासपीठ व चित्रकला दालन या सर्व अत्याधुनिक सुविधांची त्यांनी बारकाईने पाहणी केली.

या प्रसंगी मंत्री श्री. दादाजी भुसे म्हणाले, "जवाहर बालभवनला ७० वर्षांपेक्षा जास्त मोठा ऐतिहासिक वारसा लाभला आहे. या अमृत महोत्सवी वाटचाल करणाऱ्या संस्थेच्या इमारतीचा शासनाने सुमारे ८.५० कोटी रुपये खर्च करून कायापालट केला आहे. उद्या माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उपमुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत हा ऐतिहासीक सोहळा संपन्न होत असून, ही वास्तू महाराष्ट्रातील बालकांच्या सुप्त कलागुणांना वाव देणारे एक हक्काचे व्यासपीठ ठरेल."

पाहणी दरम्यान मंत्री महोदयांनी उद्याच्या सोहळ्यासाठी येणारे निमंत्रित मान्यवर, शिक्षक, मुख्याध्यापक आणि विशेषतः बालगोपाळांची आसनव्यवस्था उत्तम असावी, संपूर्ण परिसर सुसज्ज आणि स्वच्छ असावा. तसेच दिव्यांग बालकांसाठी करण्यात आलेल्या विशेष सुविधांची आणि स्वच्छतागृहांची चोख व्यवस्था ठेवावी., अशा सूचना केल्या.तसेच उद्या होणाऱ्या 'सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट, मुंबई' आणि बालभवन यांच्यातील ऐतिहासिक सामंजस्य कराराची (MoU) सर्व तांत्रिक व प्रशासकीय तयारी पूर्ण ठेवण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

या आढावा बैठकीला शालेय शिक्षण विभागाचे उच्चपदस्थ अधिकारी, बालभवनचे पदाधिकारी उपस्थित होते.

# सर्वधर्मसमभाव हाच खरा राष्ट्रवाद - विजय तांबे

*फुले, गांधी, नेहरू विचारमंच आयोजित “महात्मा गांधी आणि राष्ट्रवाद” व्याख्यानाचे प्रथम पुष्प*

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

पिंपरी, पुणे (दि. २४ मे २०२६) सर्वधर्मसमभाव हीच भारताची ओळख आणि हाच खरा राष्ट्रवाद आहे. १८८५ मध्ये जात, धर्म, भाषा, वर्ण, रंग, वंश हे सर्व सोडून हिंदू, पारशी, ख्रिश्चन, मुसलमान, शीख समाजातील नागरिक एकत्र येऊन त्यांनी काँग्रेसची स्थापना केली. हीच भारत राष्ट्र उभारणीची सुरुवात होय. भारतात एकत्वाची भावना निर्माण करून त्याचे नेतृत्व करण्याचे काम महात्मा गांधीजींनी केले. दलित समाजाला आत्मसन्मान मिळवून देण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. गांधी आणि आंबेडकरांमध्ये मतभेद होते, परंतु देशासाठी ते एकत्र होते. त्याचे फलित म्हणजे भारतीय राज्यघटना आहे असे मत ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत विजय तांबे यांनी व्यक्त केले.



रविवारी (दि. २४ मे) पिंपरी येथे फुले, गांधी, नेहरू विचारमंच च्या वतीने आयोजित केलेल्या "महात्मा गांधी आणि राष्ट्रवाद" या विषयावर आयोजित केलेल्या व्याख्यानात विजय तांबे बोलत होते.

यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, आयोजक दाहर मुजावर, अक्षय शहरकर, केनिथ रेमी तसेच विष्णू नेवाळे, अशोक मोरे, अमरसिंह नाणेकर, मिलिंद फडतरे, किरण खाजेकर, मयूर जैस्वाल, गौरव चौधरी, अनिरुद्ध कांबळे, नरेंद्र बनसोडे, हभप सांगोळे, चैतन्य रणदिवे, महेश पाटील, बाबासाहेब पाटील, गिरिजा कुदळे, सायली नढे, जीविका उठाडा, संदेश भंडारी, महालिंग स्वामी, यशराज पारखी, मॅन्युअल डिसोझा, निक्सन ऑगस्टीन, इरफान शेख, बसवराज कंजे, जिंदा सांडभोर, सूरज कुलकर्णी, सचिन दुरगुडे, वैजनाथ शिरसाठ, अनिल कदम, मनोज ढकोलिया, मंगेश मोरे, राजू शेख, अल्ताफ शेख, सुर्यकांत जाधव, किरण नढे आदी उपस्थित होते.

विजय तांबे यांनी सांगितले की, भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा पाया १९२८ मध्ये झालेल्या मिठाच्या सत्याग्रहात रचला गेला. हा सत्याग्रह अस्मितेच्या मुद्द्यावर लढला गेला. यामध्ये सर्व समाज घटकांनी सहभाग घेतला होता. १९४२ मध्ये सेवाग्राम मध्ये झालेल्या बैठकीत निशस्त्र प्रतिकाराचा निर्णय झाला. १९४७ ला स्वातंत्र्यप्राप्ती वेळी विस्टन चर्चिल याने भाकीत केले की हा देश खूप काळ एकत्र राहू शकणार नाही. या देशात अनेक धर्म, जाती, वंश आहे. परंतु त्याचे भाकीत भारतीय लोकशाहीचा राज्यघटनेमुळे खरे ठरणार नाही. देशात एकत्वाची भावना निर्माण करून त्याचे नेतृत्व महात्मा गांधी यांनी केले.

भारतातील दलित समाजाला आत्मसन्मान मिळवून देण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. पुण्यामध्ये महात्मा फुले वाड्यावर गेल्यावर महात्मा गांधी म्हणाले होते की देश घडविणारे खरे महात्मा हे जोतीराव फुले आहेत. फुले, गांधी, नेहरू या महान व्यक्तींमुळे भारतीय राष्ट्रवाद सर्व समावेशक आहे. घटना समितीच्या शेवटच्या भाषणात डॉ. आंबेडकर म्हणाले आहेत की घटना चांगली दिली आहे, परंतु ती चालवणारे देखील चांगले पाहिजेत. अशी १८८५ ते भारतीय राज्यघटना या काळातील विस्तृत माहिती विजय तांबे यांनी दिली.

अक्षय शहरकर, केनिथ रेमी यांनी स्वागत केले आणि दाहर मुजावर यांनी सूत्र संचालन केले.

## ३५ शेतकऱ्यांच्या कृषी पंपाच्या केबलची मोठी चोरी

**ओतूर (दै. संध्या) :**

जुन्नर तालुक्यातील कोळवाडी येथे पिंपळगाव जोगा धरणाच्या तीरावर असलेल्या अंदाजे ३५ शेतकऱ्यांच्या कृषी पंपाच्या केबलची चोरी झाल्याची घटना रविवारी सकाळी उघड झाली आहे. अज्ञात चोरट्यांनी रविवारी पहाटेच्या सुमारास कोळवाडी गावच्या हद्दीत पिंपळगाव जोगा धरणाच्या जलाशयाच्या तीरावर अंदाजे ३५ शेतकऱ्यांच्या कृषी पंपाच्या वीज पुरवठा करणाऱ्या केबल कापून तेथेच सोलून त्या मधुन धातूची तारा काढून नेल्या असल्यामुळे येथील शेतकऱ्यांचे अंदाजे ६ ते ७ लाख रुपया पर्यंत आर्थिक नुकसान झाले आहे.

या चोरीमुळे शेतकऱ्यांच्या अडचणीत वाढ झाली असून पिकांना, जनावरांना व स्वताच्या घरी असलेला पाणी पुरवठा पुर्ण पणे ठप्प झाला आहे . त्यामुळे लगेच नविन केबल खरेदी करुन पिकांना पाणीपुरवठा केला नाही तर या उन्हाळ्यात पिके हातची वाया जाणार आहे.

त्यामुळे अचानक उद्भवलेल्या या आर्थिक भुर्दंडामुळे शेतकऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात संतापाचे व चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. कोळवाडी व परीसरात केरू कुमकर,बाजीराव दिघे, कुंडलिक दिघे, सोहजाबाई मोरे, सुमन फोडसे, हेमलता कुमकर, ज्ञानेश्वर कुमकर, ज्ञानेश्वर कुमकर, शंकर कुमकर, बबन कुमकर, मच्छिंद्र कुमकर, खंडु कुमकर, बाबाजी कुमकर, भास्कर कुमकर, विठ्ठल कुमकर, रविंद्र कुमकर, मारूती कुमकर, नामदेव कुमकर, दत्तात्रय कुमकर, मारूती कुमकर, विश्वास कुमकर, निवृत्ती कुमकर, महादेव कुमकर, जयदास कुमकर, सिताराम कुमकर, खंडु कुमकर, विठ्ठल कुमकर, कैलास पानसरे, अक्षय कुमकर, बबन कुमकर, तुकाराम कुमकर, भास्कर कुमकर व इतर शेतकऱ्यांच्या कृषी पंपाच्या केबलची चोरी झाली आहे. याबाबत ओतूर पोलिसात सर्व शेतकऱ्यांच्या वतीने केरू कुमकर यांनी अज्ञात चोरट्यां विरोधात ४ लाख ९५ हजार ५०० रुपयाची ९ हजार ९१० फुट अपोलो कंपनीच्या तांब्याच्या तारा असलेल्या केबल वायर चोरीला गेल्याची तक्रार दाखल केली आहे.

# रडू कोसळल्याच्या आठवणीबद्दल सांगत आहे सेहज राजपूत

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

झी टीव्हीवरील ‘जाने अनजाने हम मिले’ या मालिकेत भात अहलावत (राघव) आणि आयुषी खुराणा (रीत) यांच्या प्रमुख भूमिका आहेत. या मालिकेकडे कौटुंबिक हिंसाचाराच्या कथानकामुळे अलीकडेच विशेष लक्ष वेधले गेले. यात सेहज राजपूत हिने उन्नतीची भूमिका साकारली आहे. पती विक्रांत (पुनीत राज) कडून तिला मानसिक, भावनिक आणि शारीरिक छळ सहन करावा लागतो. मात्र उन्नती अखेर त्याच्याविरोधात उभे राहत न्याय मिळवते आणि त्यामुळे तिची कथा ताकद आणि न्यायाचे प्रतीक ठरते. आता



भूतकाळातील वेदना मागे सोडून उन्नती ध्रुव (रोहित धीमान) सोबत लग्न करून आयुष्याला पुन्हा एक संधी देण्यास तयार झाली आहे. सेहज राजपूत सांगते की मागील काही महिन्यांत अशा भावनिकदृष्ट्या कठीण दृश्यांचे चित्रीकरण करणे तिच्यासाठी खूप आव्हानात्मक ठरले. मात्र, उन्नतीची ही कहाणी जर एखाद्या तरी कौटुंबिक हिंसाचार सहन करणाऱ्या व्यक्तीला धैर्य देऊ शकली तर तिला आपले काम खऱ्या अर्थाने यशस्वी वाटेल.

सेहज राजपूत म्हणाली, “अशा तीव्र आणि भावनिकदृष्ट्या अवजड दृश्यांमध्ये काम करताना माझ्यावर एक अभिनेत्री आणि व्यक्ती म्हणूनही खूप परिणाम झाला. एक क्षण असा आला की चित्रीकरण करताना मी पूर्णपणे कोसळले. विशेषतः त्या दृश्यांमध्ये, जिथे माझ्या व्यक्तिरेखेला आशा समोर दिसत असूनही तिला ती अडकलेली आणि असहाय्य वाटत होती. या दृश्यांसाठी सतत रडावे लागत असल्याने माझे डोळेही सुजले होते आणि भावनिकदृष्ट्या त्या पात्राच्या असहाय्यतेपासून स्वतःला वेगळे करणे कठीण झाले. एका टप्प्यावर तर मी माझ्या सहकलाकार पुनीतपासूनही दूर राहू लागले कारण मी कथेतल्या अस्वस्थ करणाऱ्या भावनांमध्ये पूर्णपणे गुंतले होते.”

सेहज पुढे म्हणाली, “त्याचवेळी, या प्रवासामुळे खऱ्या आयुष्यात कौटुंबिक हिंसाचार आणि भावनिक छळ सहन करणाऱ्या महिलांबद्दल माझ्या मनात अधिक सहानुभूती निर्माण झाली. आयुष्यात कितीही कठीण प्रसंग आले तरी प्रत्येक स्त्रीमध्ये लढण्याची आशा आणि ताकद असते हे त्यांनी समजून घ्यावे अशी माझी मनापासून इच्छा आहे. महिला अत्यंत मजबूत असतात पण कधीकधी त्यांना त्या अंतर्गत शक्तीची जाणीव होण्यासाठी थोडा वेळ लागतो. माझ्या अभिनयामुळे जर एखाद्या व्यक्तीलाही हार न मानता स्वतःवर विश्वास ठेवण्याची प्रेरणा मिळाली तर मला वाटेल की अभिनेत्री म्हणून मी काहीतरी अर्थपूर्ण साध्य केले आहे.”

आगामी कथानकात उन्नती आता ध्रुवसोबत नव्या आयुष्याची सुरुवात करण्यासाठी तयारी करत असून विक्रांत त्यांना खरोखर आनंदाने राहू देईल की पुन्हा एकदा त्यांच्या आयुष्यात अडथळे निर्माण करण्यासाठी परत येईल हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.

पहा ‘जाने अनजाने हम मिले’ दररोज रात्री 10.30 वाजता फक्त झी टीव्हीवर!

## थोडक्यात पण महत्वाचे...




### मॅक्सरुफ कंपनीत रक्तदान शिबिर; अधिकारी- कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

पिंपरी (दैनिक संध्या) : काळेवाडी येथील मॅक्सरूफ कॉर्पोरेशन कंपनीतर्फे आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात शनिवारी (दि.२३ मे) कंपनीतील ३९ अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सामाजिक बांधिलकी जपत रक्तदान केले. एप्रिल व मे महिन्यातील कडक उन्हाळा तसेच सुट्ट्यांच्या कालावधीत रक्तदान शिबिरे कमी प्रमाणात होत असल्याने रक्तपेढ्यांकडून रक्तसाठ्याची कमतरता भासत असल्याचे सांगण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर मॅक्सरूफ कॉर्पोरेशनचे मॅनेजिंग डायरेक्टर संजीव राय यांच्या वाढदिवसानिमित्त या रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमासाठी भोसरी येथील संजीवनी रक्तपेढीचे सहकार्य लाभले. शिबिराच्या आयोजनासाठी समन्वयक मनेश म्हस्के यांनी विशेष परिश्रम घेतले. रक्तदान करणाऱ्या सर्व रक्तदात्यांना रक्तपेढीच्या वतीने सन्मानपत्र आणि भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. सामाजिक जाणीव जपत आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाचे परिसरातून कौतुक होत आहे.



### कोयत्याने वार करून तरुणांची दहशत

पिंपरी (दैनिक संध्या) : किरकोळ कारणावरून झालेल्या वादातून तीन जणांनी एका तरुणावर कोयत्याने हल्ला करून गंभीर जखमी केल्याची घटना गुरुवारी रात्री ११ वाजता थेरगाव येथे घडली. याप्रकरणी दोन आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे. गौरव ऊर्फ नन्या गौतम वाघमारे (वय २२), रितेश क्षीरसागर (वय २१) असे अटक आरोपींची नावे आहेत. याप्रकरणी सौरभ विलास चौधरी (वय २४, सुरक्षारक्षक, रा. थेरगाव) यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सौरभ चौधरी आणि त्यांचे मित्र गप्पा मारत उभे असताना आरोपी गौरव ऊर्फ नन्या गौतम वाघमारे, रितेश क्षीरसागर आणि त्यांच्या साथीदाराने तेथे येऊन शिवीगाळ केली. त्यानंतर आरोपींनी कोयत्याने डोक्यावर आणि हातावर वार करून फिर्यादीला गंभीर जखमी केले. हल्ल्यानंतर परिसरात दहशत निर्माण करत आम्हाला कोणी अडवू शकत नाही, अशी धमकी दिली. काळेवाडी पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल करून दोन आरोपींना अटक केली असून, एक आरोपी फरार आहे. या घटनेमुळे थेरगाव परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

### दानपेटीवर डल्ला; विश्वासू सेवेकऱ्याच्या घरी पावणे चार लाखांची रोकड जप्त



आळंदी (दैनिक संध्या) : संत ज्ञानेश्वर महाराज मंदिरातील दानपेटीतील रकमेवरच सेवेकऱ्याने डल्ला मारल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. विशाल वारुळे असे संबंधित सेवेकऱ्याचे नाव असून, त्याच्या घरातून तब्बल पावणे चार लाख रुपयांची रोकड जप्त करण्यात आली आहे. विशेष म्हणजे ही रोकड १०, २०, ५० आणि १०० रुपयांच्या नोटांनी भरलेल्या पिशव्यांमध्ये आढळून आली. मिळालेल्या माहितीनुसार, विशाल वारुळे हा गेल्या तीन महिन्यांपासून मंदिरातील दानपेटीतील रक्कम जमा करणे व मोजणीचे काम करत होता. याच काळात त्याने हातचलाखी करत दानपेटीतील काही रक्कम बाजूला काढून स्वतंत्र पिशव्यांमध्ये साठवण्यास सुरुवात केल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. धक्कादायक बाब म्हणजे, ज्या दिवशी तो रोकड भरलेली पिशवी घरी घेऊन जायचा, त्या दिवशी मंदिरातील हार घेऊन जात असल्याचे सांगायचा. पिशवीच्या वरच्या भागात हार ठेवून खाली रोकड लपवली जात होती. त्यामुळे कोणालाही संशय येत नव्हता. घरी गेल्यानंतर तो ही रोकड मोजून पिशवीसह बेडमध्ये लपवून ठेवत असल्याचे तपासात समोर आले आहे. या प्रकरणामुळे मंदिर प्रशासन आणि सेवेकऱ्यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, भक्तांकडून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. पोलिसांकडून पुढील तपास सुरू असून, आणखी काही धक्कादायक बाबी समोर येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

### हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो प्रकल्पात सौरऊर्जा वापर; दरवर्षी 20 कोटींची बचत

पिंपरी (दैनिक संध्या) : पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणच्या (पीएमआरडीए) हिंजवडी ते शिवाजीनगर या पुणेरी मेट्रो प्रकल्पात पर्यावरणपूरक आणि ऊर्जा बचतीवर आधारित अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यात आला आहे. सौर ऊर्जा आणि थर्ड रेल सिस्टीमच्या वापरामुळे मेट्रोच्या वार्षिक वीज खर्चात सुमारे 20 कोटी रुपयांची बचत होणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे. या मार्गावरील सर्व 23 उन्नत स्थानकांवर तसेच कार डेपोच्या छतांवर सौर ऊर्जा पॅनेल्स बसवण्यात येत आहेत. एकूण 11 मेगावॉटपेक्षा अधिक क्षमतेचे सोलर प्लांट उभारले जात असून, त्यातून निर्माण होणारी वीज स्थानकांवरील दिवे, लिफ्ट, एस्कलेटर आणि वातानुकूलित यंत्रणांसाठी वापरली जाणार आहे. ही यंत्रणा मुख्य वीज ग्रीडशी जोडण्यात येणार असल्याने विजेचा कार्यक्षम वापर शक्य होणार आहे. हा प्रकल्प रेस्को मॉडेलवर राबवण्यात येत असल्याने पीएमआरडीएला प्रारंभी कोणताही भांडवली खर्च करावा लागलेला नाही. खासगी कंपनीने स्व:खर्चाने सौर यंत्रणा उभारून तिची देखभालही स्वीकारली आहे. मेट्रोच्या डब्यांची निर्मिती हलक्या ॲल्युमिनियम धातूपासून करण्यात आली असून, त्यामध्ये री-जनरेटिव्ह ब्रेकिंग तंत्रज्ञानाचा वापर केला आहे. त्यामुळे ब्रेक लावताना निर्माण होणारी अतिरिक्त वीज पुन्हा वापरता येणार आहे. याशिवाय, शहराचे सौंदर्य टिकवण्यासाठी ओव्हरहेड तारांऐवजी आधुनिक थर्ड रेल सिस्टीमचा वापर करण्यात आला आहे. 750 व्होल्ट डीसी वीजप्रवाह असलेल्या या प्रणालीद्वारे मेट्रो गाड्यांना थेट वीजपुरवठा केला जाणार असून, ही यंत्रणा सुरक्षित आणि कार्यक्षम मानली जाते.

### ऑनलाईन शिक्षण क्रांती; ग्रामीण भागात डिजिटल शिक्षणाचा झपाट्याने विस्तार

पिंपरी (दैनिक संध्या) : पूर्वी शहरांपुरते मर्यादित असलेले डिजिटल शिक्षण आता ग्रामीण भागातही वेगाने पोहोचताना दिसत आहे. मोबाईल, इंटरनेट आणि ऑनलाईन शिक्षण प्लॅटफॉर्मच्या मदतीने गावातील विद्यार्थी आता आधुनिक शिक्षण पद्धतीकडे वळताना दिसत आहेत. विशेषतः कोरोना काळानंतर डिजिटल शिक्षणाचे महत्त्व ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात वाढले आहे. पूर्वी अनेक ग्रामीण विद्यार्थ्यांना चांगले मार्गदर्शन, स्पर्धा परीक्षा तयारी किंवा तांत्रिक शिक्षणासाठी शहरांवर अवलंबून राहावे लागत होते. मात्र, आता मोबाईलवर उपलब्ध असलेल्या ऑनलाईन क्लासेस, यूट्यूब लेक्चर्स, डिजिटल नोट्स आणि शैक्षणिक ॲप्समुळे विद्यार्थ्यांना गावात राहूनही शिक्षण घेणे शक्य झाले आहे. त्यामुळे वेळ आणि खर्च दोन्हीची बचत होत आहे. ग्रामीण भागातील अनेक पालकदेखील आता डिजिटल शिक्षणाचे महत्त्व समजू लागले आहेत.

# स्व. राजीव गांधी स्मृतिदिनी काँग्रेसची अभिवादन सभा



पिंपरी (दै. संध्या)

देशातील संगणक क्रांतीचे, माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचे जनक आणि तरुणांना लोकशाही मध्ये वयाच्या आठराव्या वर्षी मतदानाचा हक्क प्राप्त करून देत इतरही महत्त्वाची कामे या देशासाठी करणारे भारताचे स्वर्गीय पंतप्रधान भारतरत्न राजीव गांधी यांच्या 35 व्या स्मृतिदिनानिमित्त त्यांना प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून काँग्रेस कडून अभिवादन करण्यात आले. पिंपरी चिंचवड शहर काँग्रेसचे नवनिर्वाचित अध्यक्ष नरेंद्र बनसोडे यांच्या पिंपरी येथील कार्यालयामध्ये आयोजित करण्यात आलेल्या या अभिवादन सभे मध्ये काँग्रेस कार्यकर्ते व पदाधिकारी सहभागी झाले. याप्रसंगी स्वर्गीय राजीव गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी अभिवादन करताना बनसोडे म्हणाले, "राजीव गांधींचे कार्य हे युवा पिढीला कायम प्रेरणादायक अशा स्वरूपाचे आहे त्यांनी निर्माण केलेल्या माहिती तंत्रज्ञान आणि संगणक क्रांतीतून आज लाखो रोजगार भारतामध्ये तरुणईला प्राप्त झाले आहेत, पंचायत राज व्यवस्थेमध्ये देखील त्यांनी विशेष लक्ष देऊन कार्य केले दूरसंचार निर्माण आणि सुधारणांच्या बाबतीमध्ये राजीव गांधी यांनी मोलाचे कार्य केले. इंदिराजींच्या निधनानंतर खचून न जाता पुढे त्यांच्या स्वप्नांचा भारत निर्माण करण्यासाठी राजीवजी लढत होते त्यांचे जीवन हे संवेदनेतून संघर्षाकडे पुढे जाणारे दिशादर्शक प्रेरणादायक ठरले ते आपल्या कार्य आणि जीवन मार्गाने अमर राहिले".

याप्रसंगी काँग्रेसचे शहराध्यक्ष नरेंद्र बनसोडे, शिक्षण मंडळाचे माजी सभापती अभिमन्यू दहीतुले, सेवादलाचे पुणे जिल्हा कार्याध्यक्ष पांडुरंग जगताप, ओबीसी विभागाचे प्रदेश सरचिटणीस किशोर कळसकर, महादेव वाळुंजकर, युवा नेते स्वप्निल बनसोडे, अनुसूचित जाती विभागाचे माजी शहराध्यक्ष विजय ओव्हाळ, काँग्रेस पदाधिकारी हिराचंद जाधव, हरीश डोळस, रोहित भाट, रवी नांगरे, बाबा गायसमुद्रे, मिलिंद बनसोडे, जितेंद्र छाबडा, प्रफुल्ला मोतलिंग, प्रवीण कांबळे, रामकिसन माने, पांडुरंग वीर, संजय माळी आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## पिंपरी-चिंचवडमध्ये सार्वजनिक स्वच्छतागृहांची दुरवस्था

मोशी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड शहराचा वेगाने विस्तार होत असतानाच, दुसरीकडे शहरातील सार्वजनिक आणि सामूहिक स्वच्छतागृहांची दुरवस्था हा महत्त्वाचा प्रश्न आहे. या दुरवस्थेचा त्रास स्थानिक नागरिक, महिला आणि पादचाऱ्यांना सहन करावा लागत आहे. संपूर्ण शहराचा विचार केला तर सध्या झोपडपट्टी आणि चाळ परिसरामध्ये 125 सामूहिक स्वच्छतागृहे आहेत, तर गार्डन आणि रस्त्यांच्या कडेला 701 सार्वजनिक स्वच्छतागृहे उभारण्यात आली आहेत. या सर्व ठिकाणची मिळून एकूण संख्या 3,563 इतकी स्वच्छतागृह असून, 1589 जागांवर ही व्यवस्था उपलब्ध आहे. मात्र, यातील बहुतांश ठिकाणी पाण्याच्या तीव टंचाईमुळे सर्वत्र दुर्गंधीचे सामाज्य पसरले आहे. विशेषतः मोशी, चिखली, बीआरटी रोड, एमआयडीसी या भागांतील सार्वजनिक स्वच्छतागृहांमध्ये महिला आणि पुरुषांसाठी पुरेशा सुविधांचा अभाव असल्याने बहुतांश स्वच्छतागृह म्हणजे असून अडचण नसून खोळंबा अशी आहेत. सार्वजनिक स्वच्छतागृह हाताळताना पाण्याचा अभाव हीच सर्वात मोठी अडचण आहे. अनेक स्वच्छतागृहांची अंतर्गत दुरवस्था झाली असून, नळ तुटलेले आहेत, तर काही ठिकाणी नळांना पाणीच येत नाही.

## पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात प्रतिबंधात्मक आदेश जारी

पिंपरी (दै. संध्या)



पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात शांतता व सुव्यवस्था राखणेकामी पोलीस सह आयुक्त डॉ. शशिकांत महावरकर, यांनी प्राप्त अधिकाराचा वापर करुन व महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन 1951 चे कलम 37 (1) व (3) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात 27 मे 2026 रोजी 00.01 पासून ते 9 जुन 2026 रोजी 24 वाजेपर्यंत खाली नमूद केलेली कृत्य करण्यास या आदेशान्वये मनाई करीत आहे. कोणताही दाहक पदार्थ अथवा स्फोटक पदार्थ द्रव्य बरोबर नेणे. दगड अथवा शस्त्रे किवा अस्खे सोडावयाची अस्त्रे किंवा फेकावयाची हत्यारे अगर साधने बरोबर नेणे. शस्त्रे, सोटे, भाले, तलवारी, दंड, काठ्या, बंदुका व शारिरीक इजा करण्यासाठी वापरात येईल अशी कोणतीही वस्तू बरोबर नेणे. कोणत्याही इसमाचे चित्राचे प्रतिकात्मक प्रेताचे किंवा पुढाऱ्यांच्या चित्राचे प्रतिमेचे प्रदर्शन व दहन करणे. मोठ्याने अर्वाच्य घोषणा देणे, वाद्य वाजविणे. ज्यामुळे सभ्यता अगर नितिमत्ता यास धोका पोहचेल किवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा राज्य उलथवून देण्यास प्रवृत्त करेल अशी आवेशपूर्ण भाषणे करणे किवा अविर्भाव करणे कोणतेही जिन्नस तयार करुन त्याचा जनतेत प्रसार करणे. ज्या योगे वरील परिसरात कायदा व सुव्यवस्था धोक्यात येईल अशा पध्दतीने कलम 37(1) व (3) विरुध्द वर्तन करणे. कलम 37 चे पोटकलम (3) अन्वये पाच पेक्षा जास्त लोकांचा जमाव करणे, तसेच पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांचे पुर्व परवानगी शिवाय सभा घेणे किंवा मिरवणुका काढणेस बंदी घालण्यात येत आहे. वरील संपूर्ण आदेश हा शासनाच्या सेवेतील व्यक्तींना व ज्यांना आपल्या वरीष्ठांच्या आदेशानुसार कर्तव्यपुर्तीसाठी हत्यार बाळगणे आवश्यक आहे व त्याबबात परवानगी आहे त्यांना लागू होणार नाही. या आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधित व्यक्ती महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन 1951 चे कलम 135 प्रमाणे शिक्षेस पात्र होईल.

## 'गोल्डन अवर' धोक्यात; पिंपरी-चिंचवडमध्ये रुग्णवाहिकांना विलंब



पिंपरी (दै. संध्या)

वैद्यकीय क्षेत्रात अत्यंत महत्त्वाचा मानला जाणारा 'गोल्डन अवर' रस्त्यावरच खर्ची पडत असल्याने रुग्णांच्या जीविताचा प्रश्न अधिक गंभीर बनला आहे. वाढती वाहनसंख्या आणि अपुरी वाहतूक शिस्त यामुळे आपत्कालीन सेवांचा वेग मंदावला असून, यावर ठोस उपाययोजनांची गरज व्यक्त होत आहे. अशा परिस्थितीत शहरातील रुग्णवाहिका खरोखरच वेळेत रुग्णालय गाठू शकतात का ? हा प्रश्न उपस्थित होत आहे. वाहतूक नियमांनुसार रुग्णवाहिकेला प्राधान्य देणे बंधनकारक असले तरी अनेक वाहनचालक सायरनकडे दुर्लक्ष करत असल्याचे चित्र आहे. काही जण कानात इअरफोन लावून वाहन चालवतात. तर, काही जण रुग्णवाहिकेच्या मागे जागा मिळवण्यासाठी धोकादायक पद्धतीने वाहन चालवत असल्याचेही दिसून येते. ज्यामुळे पुन्हा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

हृदयविकाराच्या झटक्यात प्रत्येक मिनिटाला हृदयाच्या पेशींचे नुकसान वाढते. ब्रेन स्ट्रोकमध्ये उपचाराला उशीर झाल्यास कायमस्वरूपी अपंगत्वाचा धोका वाढतो. तर, गंभीर अपघातातील रक्तस्राव असलेल्या रुग्णासाठी वेळेवर उपचारच जीवन-मृत्यूचा फरक ठरू शकतात. त्यामुळे रुग्णवाहिकेला दिलेला मार्ग हा केवळ वाहतूक शिस्तीचा भाग नसूनख एक सामाजिक कर्तव्य आहे. शहरातील काही प्रमुख चौकांमध्ये रुग्णवाहिका सायरन वाजवत पुढे जाण्याचा प्रयत्न करत असतानाही वाहनांच्या लांबच लांब रांगा दिसतात. काही वाहनचालक बाजूला सरकत असले तरी रस्त्यावरील अतिक्रमण, बेशिस्त पार्किंग आणि खड्ड्यांमुळे रुग्णवाहिकेचा वेग मंदावतो.

शहरातील वाढती वाहतूककोंडी आता केवळ नागरिकांच्या वेळेचाच नाही, तर थेट जीविताचाही प्रश्न बनू लागली आहे. अपघात, हृदयविकाराचा झटका, गंभीर आजार किंवा इतर आपत्कालीन परिस्थितीत रुग्णाला तातडीने उपचार मिळणे आवश्यक असते. वैद्यकीय भाषेत महत्त्वाचा मानला जाणारा गोल्डन अवर वाचवण्यासाठी रुग्णवाहिका वेगाने रुग्णालयात पोहोचणे गरजेचे असते. मात्र, शहरातील प्रमुख चौक, अरुंद रस्ते, बेशिस्त पार्किंग आणि वाहनांच्या वाढत्या गर्दीमुळे रुग्णवाहिका अनेकदा वाहतूक कोंडीत अडकताना दिसत आहेत.

**या उपाययोजनांची गरज**

- प्रमुख चौकांमध्ये स्मार्ट ट्रॅफिक सिग्नल प्रणाली
- रुग्णवाहिकांसाठी स्वतंत्र इमर्जन्सी लेन
- बेकायदेशीर पार्किंगवर कठोर कारवाई
- वाहनचालकांमध्ये जनजागृती मोहीम
- अतिक्रमण हटवून रस्ते मोकळे करणे
- वाहतूक पोलिसांची अतिरिक्त नियुक्ती बेशिस्त पार्किंगमुळे कोंडीत भर

## ३३ लाखांहून अधिक किमतीच्या सोन्याच्या चैनी लंपास

पिंपरी (दै. संध्या)

नेहरूनगर, पिंपरी येथील संतोषी माता चौकात असलेल्या शिवम ज्वेलर्स या सराफी दुकानातून चोरीची एक मोठी घटना समोर आली आहे. दुकानात काम करणाऱ्या एका कामगाराने मालकाची नजर चुकवून तब्बल ३३ लाख ९० हजार रुपये किमतीच्या ३९ सोन्याच्या चैनी चोरून नेल्या आहेत. या घटनेमुळे सराफा बाजारपेठेत खळबळ उडाली आहे. ही घटना शुक्रवारी (दि. २२ मे) रोजी सकाळी पावणे दहाच्या सुमारास उघडकीस आली. याप्रकरणी आरोपी बच्चु आशिष गांगुली (वय ३६, रा. फ्लॅट नं. ०८, भोसले आर्केड, नेहरू नगर, पिंपरी) याच्याविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. सध्या तो फरार असून पोलीस शोध घेत आहेत. याप्रकरणी शिवम ज्वेलर्सचे मालक उमेश छगनलाल जैन (वय ५३, रा. शंखेश्वर दर्शन बिल्डिंग, नेहरूनगर, पिंपरी) यांनी शुक्रवारी (दि. २२ मे) रोजी पिंपरी पालीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही चोरी शुक्रवारी (दि. २२ मे) रोजी सकाळी ९.४० ते ९.४५ च्या सुमारास संतोषी माता चौकातील 'शिवम ज्वेलर्स' येथे झाली. दुकानात कामाला असलेल्या आरोपी बच्चु गांगुली याने चोरीच्या उद्देशाने दुकानात ठेवलेल्या २२ कॅरेटच्या वेगवेगळ्या आकाराच्या आणि वजनाच्या एकूण ३९ नग सोन्याच्या चैनी (एकूण वजन २२५.८०० ग्रॅम) लंपास केल्या. या सोन्याच्या चैनींची बाजारातील किंमत ३३ लाख ९० हजार रुपये आहे. मालकाची नजर चुकवून आरोपीने हा ऐवज चोरून नेला. या प्रकरणाचा पुढील तपास संत तुकाराम नगर पोलीस ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षक पाटील करीत आहेत.

# सर्व कामगार संघटनांनी किमान कार्यक्रमावर तरी एकत्र यावे

पिंपरी (दै. संध्या)




**डॉ. श्रीपाल सबनीस यांचे आवाहन**

प्रत्येक कामगार संघटनेचा चेहरा वेगळा असू शकतो . मात्र कामगार हितासाठी सर्व कामगार संघटनांनी किमान कार्यक्रमावर एकत्र यायला हरकत नाही असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. श्रीपाल सबनीस यांनी येथे केले. नवीन श्रमसंहितेत काही कायदे लोककल्याणकारी असल्याचे दाखवण्याचा प्रयत्न सरकारने केला असल्याची टिप्पणी त्यांनी केली. नवीन कामगार कायद्यांमध्ये चांगले कोणते आणि वाईट कोणते ? यावर चिंतन करण्यासाठी अभ्यास वर्ग घ्यावेत असे आवाहन त्यांनी केले.

कष्टकरी संघर्ष महासंघ महाराष्ट्र यांच्या वतीने रोटरी क्लब हॉल संभाजीनगर चिंचवड येथे 'कामगार क्षेत्र काल आज आणि उद्या 'या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अध्यक्षस्थानावरून डॉ. सबनीस बोलत होते. या चर्चासत्रात कामगार नेतृत्वाची भूमिका या विषयावर ज्येष्ठ नेते मानव कांबळे, महाराष्ट्र मजदूर संघाचे अध्यक्ष इरफान सय्यद, कामगार नेते सचिन लांडगे, महाराष्ट्र मजदूर संघाचे अध्यक्ष इरफान सय्यद यांनी तर कामगार क्षेत्राबाबत माध्यम प्रतिनिधींची भूमिका या विषयावर ज्येष्ठ पत्रकार नंदकुमार सातुर्डेकर, जयंत जाधव,जयंत शिंदे यांनी मते मांडली. तर कामगार व्यवस्थापन समन्वय या विषयावर राजेंद्र घावटे यांनी मत मांडले. कार्यक्रमाचे आयोजन कष्टकरी संघर्ष महासंघ महाराष्ट्र अध्यक्ष काशिनाथ नखाते यांनी केले होते. या कार्यक्रमात कामगार नेते भरत शिंदे यांना कामगार रत्न तर ज्येष्ठ पत्रकार जयंत जाधव यांना कामगार मित्र पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी सबनीस म्हणाले की, ज्या काळात कामगार नेते मालकांशी सौदेबाजी करतात अशा काळात संघटित कौशल्य आणि शिस्त अंगी बाळगत काशिनाथ नखाते यांच्यासारखा कार्यकर्ता काम करत आहे ही आनंदाची गोष्ट आहे. कामगार नेत्याला कामगार चळवळीचा इतिहास माहीत असणे गरजेचे आहे त्याला तो माहीत नसेल तर तो भविष्याचा वेध काय घेणार असा सवाल सबनीस यांनी केला. कामगार चळवळीत पक्ष आणि संघटना असे चित्र दिसत आहे. मात्र कामगारांच्या हिताचा व सत्याचा पक्ष असावा. आपली आयडॉलॉजी सुसंगत असेल तर कामगारांना निश्चितपणे न्याय देता येईल असे ते म्हणाले. काशिनाथ नखाते हे भाजपमध्ये जाणार असल्याची चर्चा आहे मात्र त्यांनी तसे केल्यास मी पिंपरी चिंचवड मध्ये त्यांच्या विरोधात निषेध सभा घेईन असा टोला डॉ. सबनीस यांनी हाणला.

परिसंवादात बोलताना मानव कांबळे यांनी पिंपरी चिंचवड मधील कामगार चळवळीवर भाष्य केले. कामगार नेत्यांच्या हाय फाय राहणीमानावर बोचरी टीका केली. हल्ली कंपन्यांचे करार फाईव्ह स्टार हॉटेलमध्ये होत आहेत. कामगार नेते महागड्या गाड्यांमधून फिरत आहेत अशी टिप्पणी त्यांनी केली.

ज्येष्ठ पत्रकार नंदकुमार सातुर्डेकर यांनी कामगार चळवळीचा इतिहास सांगत असताना 1980 नंतर मुंबईतील कापड गिरणी कामगारांचा संप अयशस्वी झाल्यानंतर कामगार चळवळ कमकुवत झाली. त्यातच जागतिकीकरण व कंत्राटी पद्धतीमुळे कामगार चळवळीवर मोठा आघात झाला आहे. संघर्ष करायला जावे तर मिळत असलेली अर्धी भाकरी ही गमवायला लागायची या भीतीने कामगारांना ग्रासले आहे फारसा संघर्ष न करता मिळेल ते पदरात पाडून घेण्याची मानसिकता वाढल्याने कामगार संघटनांपुढे आव्हान वाढले आहे. बाहेरचे नेतृत्व एका उद्योगात अनेक संघटना राजकीय पक्षांशी अंकित संघटना, नवीन कामगार संहिता यामुळे कामगार चळवळी पुढे मोठे आव्हान उभे आहे. रोबोटिक्स आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यामुळे काही नोकऱ्या कमी होणार आहेत. वर्क फ्रॉम होम, ऑनलाइन काम वाढेल ग्रीन एनर्जी आणि पर्यावरण पूरक उद्योगांमध्ये रोजगार वाढेल स्पर्धेत टिकून राहण्यासाठी कामगारांना अपडेट राहावे लागणार आहे. असे सातुर्डेकर यांनी सांगितले भविष्यात असंघटित कामगारांची संख्या वाढणार आहे त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी कामगार संघटनांना काम करावे लागेल असे ते म्हणाले.

कार्यक्रमासाठी अध्यक्ष काशिनाथ नखाते यांच्यासोबतच सिद्धनाथ देशमुख, युवराज निलवर्ण, राजेश माने, तुषार घाटुळे, अनिल बारवकर, इरफान चौधरी, लाला राठोड, बालाजी लोखंडे, सहदेव होनमाने, सुनील भोसले, सखाराम केदार आदींनी परिश्रम घेतले.



नीरा नदीच्या काठावरील दत्तघाटावरील ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व किर्तन मोहत्सवात बोलताना आमदार रोहित पवार.

## दादांच्या आठवणींनी भावूक झाले रोहित पवार

**नीरा (दै. संध्या)**

पुणे आणि सातारा जिल्ह्यांच्या सीमेवरील पवित्र नीरा नदीकाठावरील दत्त घाट येथे सुरू असलेल्या ११ दिवसीय भव्य कीर्तन महोत्सवात शनिवारी कर्जत-जामखेडचे आमदार रोहित पवार यांनी उपस्थित राहून वारकरी संप्रदायाच्या विचारांचा जागर केला. "दादा इथे येणार होते, पण दादा आता आपल्यात नाहीत," असे सांगताना ते भावूक झाले. दादांचा फोटो व्यासपीठावर ठेवण्यात आल्याबद्दल त्यांनी पवार कुटुंबाच्या वतीने आयोजकांप्रती ऋण व्यक्त केले.

हरिनामाच्या गजरात आणि "माऊली माऊली"च्या जयघोषात रंगलेल्या या सोहळ्यात बोलताना रोहित पवार म्हणाले, "आपण सर्व संतांमुळे एकत्र आलो आहोत. वारकरी संप्रदाय जात-धर्म पाहत नाही. माणुसकीच्या दृष्टीने सर्वांकडे पाहण्याची शिकवण हा संप्रदाय देतो. वारकरी परंपरेचा आमच्यावर मोठा पगडा आहे आणि संतांचे विचार पुढे नेण्याची जबाबदारी आपली आहे."

वारकरी संप्रदायात काही जण वेगळा विचार आणण्याचा प्रयत्न करीत असल्याचा उल्लेख करत त्यांनी, "त्यांना सांगा, आम्हाला संतांचे विचारच पुढे घेऊन जायचे आहेत," असा स्पष्ट संदेश दिला. यावेळी त्यांनी संत सावतामाळी पालखी सोहळ्यासाठी दोन किलो चांदीचा पाट अर्पण करण्याची इच्छा व्यक्त केली. "इथून अरणला जाणाऱ्या पालखीतील पादुका त्या ताटात ठेवाव्यात आणि भविष्यात कोणत्याही परिस्थितीत ती परंपरा बदलू नये," अशी भावनिक विनंतीही त्यांनी केली. नीरा नदीकाठावरील दत्त घाट परिसर सध्या भागवत कथा, नवविधा भक्ती, हरिनाम सप्ताह आणि कीर्तन सेवेमुळे भक्तिमय वातावरणाने भारावून गेला असून, हजारो भाविक या महोत्सवात सहभागी होत आहेत. किर्तन महोत्सवाचे प्रमुख ह.भ.प. दिलीप झगडे महाराज, ह.भ.प. दत्तात्रय महाराज फरांदे, शंकरराव मर्दाने, दत्ताजीराव चव्हाण, माणिकराव चोरमले, पुणे जिल्हा राष्ट्रवादी कॉंगेसचे उपाध्यक्ष राजेश चव्हाण, पी.डी.सी.सी.बँकेचे संचालक संभाजीनश होळकर, अनिल चव्हाण यांसह सांप्रदायिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# दादांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी मी तुमच्यासोबत

## हरिनाम सप्ताहांना कायम मदत करणार : उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार

**दत्तघाटावर भक्तिरसात रंगल्या सुनेत्रा पवार; संतपरंपरा, मानवसेवा आणि अजितदादांच्या आठवणींनी वातावरण भावूक**

**नीरा (दै. संध्या)**

"मानवता हाच धर्म आणि मानवतेची सेवा हीच सर्वश्रेष्ठ सेवा," या विचाराने आयुष्य जगणाऱ्या अजितदादांनी प्रत्येक क्षण जनतेसाठी अर्पण केला. त्यांच्या अपूर्ण राहिलेल्या स्वप्नांना पूर्ण करण्यासाठी मी तुमच्या सर्वांच्या पाठिंब्यावर उभी आहे. आपले आशीर्वाद कायम माझ्यासोबत राहू द्या... अशा शब्दांत राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी दत्तघाटावरील भक्तिमय वातावरणात भावनांना वाट मोकळी करून दिली. पुरंदर तालुक्यातील नीरा येथील श्री क्षेत्र दत्तघाट, पाडेगाव येथे आयोजित सकल संत सेवा स्मरण सोहळा, कीर्तन महोत्सव तथा श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ आणि अखंड हरिनाम सप्ताहाला शनिवारी रात्री त्यांनी सदिच्छा भेट दिली. हरिनामाच्या अखंड गजरात, टाळ-मृदंगाच्या निनादात आणि भक्तांच्या ओसंडून वाहणाऱ्या श्रद्धेमध्ये सुनेत्रा पवार यांचे आगमन होताच संपूर्ण परिसर भक्तीभावाने भारावून गेला. यावेळी बोलताना त्या म्हणाल्या,



"दादांची इच्छा होती की समाजात असे मोठे आध्यात्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम व्हावेत. संतांच्या विचारांतूनच समाजात माणुसकी, ऐक्य आणि संस्कार टिकून आहेत. आजच्या धावपळीच्या जीवनात कीर्तन, प्रवचन आणि हरिनाम सप्ताहासारखे उपक्रम लोकांना मानसिक समाधान आणि अध्यात्मिक ऊर्जा देतात. अशा कार्यक्रमांसाठी लागेल ती मदत कायम केली जाईल." दिवंगत अजितदादांच्या स्मृतींना समर्पित करण्यात आलेल्या या सोहळ्याबद्दल समाधान व्यक्त करताना त्यांचा स्वर अनेकदा भावूक झाला. "मी संत गोरोबाकाकांच्या भूमीतील लेक आहे. आमच्या घरातही सांप्रदायिक परंपरेशी घट्ट नाते आहे. आजही कीर्तन आणि प्रवचन ऐकण्याची मनापासून इच्छा असते. आज इथे जास्त वेळ बसता आलं नाही, पण पुढील काळात नक्कीच वेळ काढून अशा भक्तिमय वातावरणात सहभागी होईन," अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या. यावेळी त्यांनी संप्रदायातील महाराज मंडळी, टाळकरी, भजनी मंडळी आणि भाविकांशी आत्मीय संवाद साधला. भक्तांच्या डोळ्यांतून ओघळणारी श्रद्धा आणि सुनेत्रा पवार यांच्या शब्दांतून उमटणारी दादांविषयीची आपुलकी यामुळे वातावरण अधिकच भावनिक झाले होते.

या सोहळ्यास ह.भ.प. दिलीप झगडे महाराज, ह.भ.प. दत्तात्रय महाराज फरांदे, शंकरराव मर्दाने, प्रा. डॉ. दिगंबर दुर्गाडे, संभाजी होळकर, डॉ. प्राजक्ता दुर्गाडे, मोनिका कांबळे, स्मिता निगडे, माणिकराव चोरमले, राजेश चव्हाण, अनिल चव्हाण, विराज काकडे, तेजश्री काकडे, विजयराव धायगुडे, मंगल माने, गोपिचंद धायगुडे, डॉ. नितीन सावंत, कांचन निगडे, प्रमोद काकडे, पृथ्वीराज निगडे, संतोष माने, गजानन माने, ज्ञानेश्वर धायगुडे, शिवाजीराव गारोळे यांच्यासह सांप्रदायिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

दत्त देवस्थानचे पदाधिकारी, महाराज मंडळी, टाळकरी, भजनी मंडळी आणि पंचक्रोशीतील हजारो भाविकांच्या उपस्थितीमुळे संपूर्ण दत्तघाट परिसर हरिनामाच्या गजराने, भक्तिरसाने आणि दादांच्या स्मृतींनी अक्षरशः भारावून गेला होता.

## जुन्नर तालुक्यात पावसाची हजेरी

**नारायणगाव (दै. संध्या)**

जुन्नर तालुक्याच्या पूर्व व मध्य भागात बुधवारी सायंकाळी साडेचार ते साडेपाच वाजण्याच्या दरम्यान ढगांच्या गडगडाटासह मुसळधार पावसाने आणि गारांच्या तडाख्याने हजेरी लावली .या पावसामुळे शेती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.बांगरवाडी परिसरात सुमारे अर्धा तास गारांचा पाऊस झाला. यामुळे परिसरातील शेतकऱ्यांचे कांदा, टोमॅटो ,आंबा, डाळिंब, शेतातील उन्हाळी बाजरी अशा इतर भाजीपाला पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

तालुक्यात सकाळपासूनच ढगाळ वातावरण होते. प्रचंड उकाडा जाणवत होता. पाच ते साडेपाच वाजण्याच्या सुमारास बांगरवाडी परिसरात गारांचा मुसळधार पाऊस झाला. गारांच्या तडाख्यामुळे डाळिंब , टोमॅटो इत्यादी पिकाचे मोठे नुकसान झाले. पाणीटंचाईचा सामना करत अतिशय प्रतिकूल परिस्थितीत शेतकऱ्यांनी उन्हाळ्यात डाळिंब बाग व टोमॅटो जोपासली होती. डाळिंबाची झाडे फळांनी लगडलेली होती. जुलै महिन्यात डाळिंबा तोडणीचा पहिला हंगाम सुरू होणार होता.गारांचा तडाखा बसल्याने कोवळ्या डाळिंबाच्या फळांना जखमा झाल्या आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. सायंकाळी साडेपाच नंतर जुन्नर तालुक्याच्या मध्य भागातील मांजरवाडी, नारायणगाव, येडगाव,वारूळवाडी, बांगरवाडी परिसरात वादळी वाऱ्यासह मुसळधार गारपिटीचा पाऊस सुरू झाला. वादळामुळे आंब्याच्या फळांची मोठ्या प्रमाणात गळ झाली. उन्हाळी बाजरीचे पीक,टोमॅटो, कांदा, डाळिंब या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

## मुख्यमंत्री सचिवालयाच्या अर्जावर तातडीने कार्यवाहीचे निर्देश

### पुणे महानगरपालिकेकडून संबंधित विभागांना सूचना

**कोरेगावमुळ (दै. संध्या)**

राज्यातील सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन प्रश्नांबाबत मुख्यमंत्री सचिवालयाकडे प्राप्त होणाऱ्या अर्जांवर तातडीने कार्यवाही करण्याच्या अनुषंगाने पुणे महानगरपालिकेने संबंधित विभागांना आवश्यक सूचना दिल्या आहेत. मुख्यमंत्री सचिवालय कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय पुणे यांच्याकडून प्राप्त झालेल्या अर्जाच्या संदर्भात ही कार्यवाही करण्यात येत आहे. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या दि. १६ डिसेंबर २०२२ रोजीच्या पत्रानुसार जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे येथे मुख्यमंत्री सचिवालय कक्ष स्थापन करण्यात आला आहे. या कक्षामार्फत पुणे




महानगरपालिकेशी संबंधित अर्ज सामान्य प्रशासन विभागामार्फत संबंधित खात्यांकडे पाठविण्यात येतात. यासंदर्भात मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) यांनी दि. ५ फेब्रुवारी २०२५ रोजीच्या आदेशान्वये संबंधित विभागांनी अर्जांवर त्वरित कार्यवाही करावी, असे निर्देश दिले आहेत. टोकन क्रमांक ३०५/२०२६ व सा.प्र.आ. क्र. १८३७, दि. ६ मे २०२६ अन्वये प्राप्त झालेला अर्ज हिंगणगावचे माजी सरपंच श्री. अंकुश कोतवाल यांचा असून तो आरोग्य विभाग, घनकचरा व्यवस्थापन विभाग आणि पाणीपुरवठा विभागाशी संबंधित असल्याचे नमूद करण्यात आले आहे. सदर अर्जातील विषयाच्या अनुषंगाने संबंधित विभागांनी आवश्यक माहिती देऊन योग्य ती कार्यवाही करावी तसेच अर्ज अंतिम करण्यात आल्याची माहिती अर्जदारास कळविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

यासोबतच कार्यवाहीचा अहवाल मा. निवासी उपजिल्हाधिकारी तथा पदसिद्ध विशेष कार्य अधिकारी, मुख्यमंत्री सचिवालय कक्ष (सीएमओ) यांना ई-मेलद्वारे पाठविण्यात यावा, असेही नमूद करण्यात आले आहे. तसेच कार्यवाही अहवालाची प्रत मा. उप आयुक्त, सामान्य प्रशासन विभाग, पुणे महानगरपालिका यांनाही पाठविण्याच्या सूचना संबंधित विभागांना देण्यात आल्या आहेत.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### जेजुरी गडावर भाविकांची मोठी गर्दी

जेजुरी (दैनिक संध्या) : महाराष्ट्राचे कुलदैवत व बहुजन समाजाचा लोकदेव असणाऱ्या जेजुरीच्या खंडोबा देवाच्या दर्शनासाठी रविवारी लाखभर भाविकांनी गर्दी केली होती. अधिक मास, तसेच शाळांना असणाऱ्या सुट्ट्या यामुळे श्री खंडोबा देवाचे दर्शन, कुलधर्म कुलाचार नुसार धार्मिक विधी करण्यासाठी जेजुरी गडावर भाविकांची प्रचंड गर्दी झाली होती. जेजुरी गड, पायरी मार्ग, ऐतिहासिक चिंचेची बाग, मुख्य महाद्वार पथ भाविकांनी फुलून गेला होता. भाविकांच्या अनुषंगाने भंडार खोबरे, हार फुले, प्रसाद, देवाचे टाक,फोटो, दिवटी बुढली, हॉटेल्स निवास व्यवस्था आदी दुकाने हाऊसफुल पहाण्यास मिळाली.

### जागा मोजणीसाठी प्रशासनाने दाखवला हिरवा कंदील; बेघर नागरिकांमध्ये नवचैतन्य

चाकण (दैनिक संध्या) : पाच हजार बेघर बांधवांना चांदुस गावच्या गावठाणा बाहेर येत असलेल्या शासनाच्या मालकीच्या जमीनीवर राहण्यासाठी एक गुंठा जागा मिळावी, यासाठी गेली दोन महिने भापसे पार्टीचे अध्यक्ष दीपक ताटे यांचे पुण्याच्या जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण सुरू होते. जागा मोजणीची फी भरूनही प्रशासन जागा मोजत नसल्याने मरण पत्करेन पण उपोषण सोडणार नाही, असा निर्धार ताटे यांनी केल्याने खडबडून जागे झालेल्या प्रशासनाने जागा मोजणीस हिरवा कंदील दाखवला असून, अखेर जागा मोजणीचा मार्ग मोकळा झाला आहे. खेड तालुक्यातील चांदुस येथील शासनाच्या मालकीची जमीन गट नंबर ५९१,४७४ व १४२ या सरकारी जमिनीवर बेघर नागरिकांना राहण्यासाठी एक गुंठा जागा मिळावी, यासाठी ताटे यांनी पुण्याच्या जिल्हाधिकारी कार्यालयासमोर दोन महिने उपोषण केले. खेड तालुका प्रशासनाच्या आदेशानुसार दीपक ताटे यांनी दि.१४ सप्टेंबर, २०२२ रोजी अति तातडीची लाखो रुपयांचा मोजणी शुल्क शासनास भरला आहे. जमीन मोजणीच्या यापूर्वी तीन वेळा तारखा देऊनही मोजणी झाली नव्हती. सरकारी जागा मिळावी याकरिता शासन दरबारी आंदोलने, मोर्चा, उपोषण आदींच्या माध्यमातून ताटे हे प्रयत्न करत होते. पोटाची खळगी भरण्याकरता खेड तालुक्यात आलेल्या बेघर नागरिकांना राहण्यासाठी शासनाने सरकारी जागा मोजण्यास शासन निर्णय दि.९ फेब्रुवारी, २०१० च्या निर्णया नुसार हिरवा कंदील दाखवल्याने बेघर नागरिकांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे.

### वाघोलीत मान्सूनपूर्व पावसाने उघड केल्या जलनिस्सारण व्यवस्थेच्या त्रुटी

वाघोली (दैनिक संध्या) : वाघोली परिसरात शुक्रवारी (दि. 22) झालेल्या मान्सूनपूर्व पावसामुळे महापालिका प्रशासनाच्या पावसाळापूर्व नियोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. परिसरातील अनेक भागांतील रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात पावसाचे पाणी तुंबल्याचे चित्र या वेळी दिसून आले. विशेषतः फुलमळा-भावडी रस्त्यावरील महावितरण कार्यालयासमोर पाणी साचल्याने वाहनचालक व नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागला. परिसरातील मुख्य आणि अंतर्गत रस्त्यांवर ठिकठिकाणी पावसाचे पाणी तुंबल्याचे चित्र दिसून आले. गेली अनेक वर्षांपासून हा प्रश्न अद्यापही सुटला नाही. पाण्यामुळे खड्ड्यांचा अंदाज येत नसल्याने दुचाकीस्वारांना मोठी कसरत करावी लागली.

## 'इंद्रायणी नदी स्वच्छता अभियान'; हजारो स्वयंसेवकांचा उत्स्फूर्त सहभाग

**आळंदी (दै. संध्या)**

जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्य महाराज यांच्या प्रेरणा आणि मार्गदर्शनाखाली आळंदीत इंद्रायणी नदी स्वच्छता अभियान उत्साहात पार पडले. अखिल भारतीय हिंदू संग्राम सेनेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या अभियानात हजारो स्वयंसेवकांसह नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. या वेळी आळंदी देवस्थानचे विश्वस्त चैतन्य महाराज कबीरबुवा, महापौर रवी लांडगे, नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, उपनगराध्यक्ष सुजाता तापकीर, नगरसेविका साक्षी कुऱ्हाडे, सचिव अजित वडगांवकर तसेच विविध संस्थांचे पदाधिकारी आणि स्वयंसेवक उपस्थित होते.

स्वच्छता मोहिमेदरम्यान इंद्रायणी घाट परिसर आणि नदीपात्रातील मोठ्या प्रमाणावर साचलेला कचरा हटविण्यात आला. नदीत साचलेली जलपर्णी, जीर्ण कपडे, विसर्जित मूर्ती,



प्लास्टिक पिशव्या, मातीची मडकी तसेच इतर टाकाऊ वस्तू बाहेर काढण्यात आल्या. घाट परिसरातील कचरा, मातीचा राडारोडा आणि बंधाऱ्याजवळ वाढलेली जलपर्णी जेसीबीच्या सहाय्याने हटविण्यात आली. या उपक्रमात नदी स्वच्छतेसोबतच व्यसनमुक्तीबाबतही जनजागृती करण्यात आली. "नशा असावी प्रगतीची, दारू-गुटख्याची नव्हे" तसेच "तुमचा दृढ निश्चय हाच दुर्व्यसनमुक्तीवर विजय" अशा संदेशांचे फलक हातात घेऊन स्वयंसेवकांनी समाजप्रबोधन केले.

या अभियानासाठी आळंदी नगरपरिषदेचे सहकार्य लाभले. तीर्थक्षेत्रांची पावित्र्यता जपणे, जलसंवर्धन करणे तसेच नदीपात्रातील कचरा आणि जलपर्णी हटवून इंद्रायणी नदी निर्मळ ठेवणे हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले. जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्य महाराज यांच्या प्रेरणेने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे विविध स्तरांतून कौतुक होत आहे.

## उन्हाळा आणि वणव्यांमुळे वन्यजीवांची पाण्यासाठी तगमग सुरू

**खडकवासला (दै. संध्या)**

उन्हाची वाढती तीव्रता आणि भीषण वणव्यांमुळे जंगलातील नैसर्गिक चारा व खाद्य नष्ट झाले आहे. परिणामी, सिंहगड, पानशेतच्या जंगलातील वन्यजीवांची पाण्यासाठी प्रचंड वणवण सुरू आहे. त्यांची पाण्यासाठी होणारी तगमग ओळखून वन विभागाच्या वतीने सिंहगडच्या जंगलातील विविध ठिकाणच्या सहा पाण्याच्या तळ्यांमध्ये पाण्याची विशेष सोय केली आहे. कडकडीत उन्हामुळे जंगलातील बहुतांश नैसर्गिक झरे आणि पारंपरिक पाणवठे पूर्णपणे कोरडे पडले आहेत. त्यामुळे पाण्याचा शोध घेत मोर, ससे, हरिण, काळवीट आदी वन्यजीव नागरी वस्त्यांच्या परिसरात, तसेच खडकवासला आणि पानशेत धरणाच्या पाणलोट क्षेत्रात धाव घेत आहेत. वन्यजीवांची पाण्यासाठी होणारी वणवण थांबून त्यांची तहान भागविण्यासाठी वन विभाग आणि स्थानिक समित्या सरसावल्या आहेत. घेरा सिंहगड संयुक्त वनव्यवस्थापन समितीच्या वतीने सिंहगड किल्ल्याच्या पश्चिमेला असलेल्या थोपटेवाडी (ता. हवेली) परिसरातील शिवकालीन काळूबाई जंगलातील दोन तळ्यांमध्ये सध्या टँकरने पाणी सोडले जात आहे. आतकरवाडी येथील दोन आणि सिंहगड किल्ल्याच्या घाट रस्त्यावरील तळई उद्यान परिसरातील दोन तळ्यांमध्येही नियमितपणे टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे. सर्व वनतळ्यांमध्ये दर आठवड्याला प्रत्येकी 2 ते 3 टँकर पाणी सोडले जात आहे. एप्रिल ते मे या दोन महिन्यांच्या कालावधीत आतापर्यंत जवळपास 100 टँकर पाणी या तळ्यांमध्ये सोडले आहे.

## चाकण बाजारात काकडी, चवळी, टोमॅटो दोडका व भुईमूग शेंगांची विक्रमी आवक

**काकडी, चवळी, टोमॅटो, दोडका, शेवगा व भुईमूग शेंगांची विक्रमी आवक**

**चाकण (दै. संध्या)**

खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केटयार्ड मध्ये काकडी, चवळी, टोमॅटो, दोडका, शेवगा व भुईमूग शेंगांची विक्रमी आवक झाली. पालेभाज्यांची आवक वाढूनही भाव कडाडले. एकूण उलाढाल १३ कोटी २० लाख रुपये झाली.चाकण येथील बाजारात कांद्याची एकूण आवक १ हजार क्विंटल झाली. कांद्याला कमाल भाव ७०० ते १,३०० रुपये मिळाला. बटाट्याची एकूण आवक १,४०० क्विंटल झाली. बटाट्याला कमाल भाव ९०० ते १,४०० रुपये मिळाला. लसणाची एकूण आवक २५ क्विंटल झाली. लसणाला १० हजार रुपये कमाल भाव मिळाला. हिरव्या मिरचीची एकूण आवक ३६५ क्विंटल झाली. हिरव्या मिरचीला ३ हजार रुपयां पासून ४ हजार रुपयांपर्यंत भाव मिळाला.

शेतीमालाची आवक व बाजारभाव पुढीलप्रमाणे :
कांदा - एकूण आवक - १,००० क्विंटल.भाव क्रमांक - १.१,३०० रुपये, भाव क्रमांक २.१,१०० रुपये, भाव क्रमांक ३.७००.
बटाटा - एकूण आवक - १,४०० क्विंटल.भाव क्रमांक १.१,४०० रुपये, भाव क्रमांक २.१,००० रुपये, भाव क्रमांक ३.९०० रुपये.

फळभाज्या : फळभाज्यांच्या बाजारात एकूण आवक क्विंटलमध्ये व प्रतीदहा किलोंसाठी मालाला मिळालेले भाव कंसात पुढील प्रमाणे -

टोमॅटो - ३०६ क्विंटल (१,४०० ते २,००० रू.), कोबी - १८० क्विंटल (६०० ते १,००० रू.), फ्लॉवर - १७० क्विंटल (१,००० ते १,५०० रु.), वांगी - ८४ क्विंटल (१,५०० ते २,५०० रु.), भेंडी - ७६ क्विंटल (२,५०० ते ३,५०० रु.), दोडका - ५४ क्विंटल (२,५०० ते ३,५०० रु.), कारली - ६६ क्विंटल ( ३,००० ते ४,००० रु.), दुधीभोपळा - ४८ क्विंटल (१,००० ते २,००० रु.), काकडी - ८४ क्विंटल (१,५०० ते २,५०० रु.), फरशी - १४ क्विंटल (८,००० ते १०,००० रु.), वालवड - २४ क्विंटल (५,००० ते ७,००० रुपये), ढोबळी मिरची - १४२ क्विंटल (६,००० ते ७,००० रु.), चवळी - ३५ क्विंटल (१,००० ते ३,५०० रु.), वाटाणा - ४० क्विंटल (६,००० ते ८,००० रू. ), शेवगा - ४५ क्विंटल (१,५०० ते २,५०० रु.), गाजर - २१० क्विंटल (१,००० ते २,००० रु.), गवार - ८८ क्विंटल (२,५०० ते ४,००० रु. )



## थोडक्यात पण महत्वाचे...



### साधिका बहुद्देशीय सेवाभावी संस्थेच्यावतीने एसटी स्मार्ट कार्ड शिबिर संपन्न

बारामती (दैनिक संध्या) : महिलांना एसटीच्या सवलतींचा फायदा घेता यावा यासाठी हनुमाननगर, बारामती येथे दिनांक 23 मे 2026 रोजी एसटी स्मार्ट कार्ड शिबिर घेण्यात आले. या संस्थेच्या माध्यमातून नेहमीच महिलावर्गासाठी सामाजिक उपक्रम परिसरात राबवले जातात." साधिका बहुउद्देशीय सेवाभावी संस्था " हनुमाननगर (बारामती) यांच्यावतीने हे शिबिर आयोजित करण्यात आले होते.संस्थेच्या वतीने परिसरातील महिलांसाठी उपयुक्त असा हा उपक्रम राबवण्यात आला.या शिबिराचे आयोजन संस्थापक अध्यक्षा अर्चना सातव,उपाध्यक्षा हर्षदा सातव,माधवी शेंडगे यांनी केले.यावेळी एसटी स्मार्ट कार्ड काढण्यासाठी हनुमाननगर व आसपासच्या परिसरातील महिलांचा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला.

### आशुतोष बारकुल यांच्यावर चौकशी करून कारवाईचे मुख्यमंत्री सचिवालयाचे आदेश!

भिवंडी (दैनिक संध्या) : सर्वसामान्य नागरिकांना वाहना संबंधित विविध शासकीय सेवा घेण्यासाठी, वाहन नोंदणी, परवाना नूतनीकरण, नवीन परवाना, हस्तांतरण फिटनेस प्रमाणपत्र परवाना दुरुस्ती, कर भरणा इत्यादी कामांसाठी सर्वसामान्य नागरिक हे उपविधी प्रादेशिक कार्यालयाकडे उपप्रादेशिक कार्यालयाकडे जावे लागते, सदरच्या उपप्रादेशिक परिवहन कार्यालयामध्ये कार्यरत असलेले श्री आशुतोष बारकुल यांच्या कामकाजामध्ये अनागोंदी कारभार मनमानी कारभार कर्तव्यातील दुर्लक्ष, दलालांचा हस्तक्षेप इत्यादी बाबी निदर्शनास येत आहेत असे राष्ट्रीय मानव हक्क मंचाचे अध्यक्ष श्री शरद काशिनाथ धुमाळ यांनी आपल्या निवेदनात नमूद केल्यामुळे त्याची गंभीर दखल घेऊन मुख्यमंत्री सचिवालय कक्ष कोकण विभाग यांनी संबंधित परिवहन आयुक्त महाराष्ट्र राज्य परिवहन आयुक्त कार्यालय मुंबई यांना आदेश निर्गमित करण्यात आले आहेत की, संबंधित उप प्रादेशिक परिवहन अधिकारी श्री आशुतोष बारकुल यांच्यासहित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. सदर प्रस्तावित कारवाईच्या आदेशामुळे उपप्रादेशिक परिवहन कार्यालय कल्याण येथील जबाबदार अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कशी आणि कोणत्या स्वरूपात कारवाई होणार आहे याबाबत उलट सुलट चर्चा सुरू असून प्रशासनात एकच खळबळ माजली आहे.

### 'एसबीआय म्युच्युअल फंडा'चा गुंतवणूकदार शिक्षण आणि जागरुकता उपक्रम

पुणे (दैनिक संध्या) : पैशांबद्दल बोलताना 'मी कुठे गुंतवणूक करू?' हा प्रश्न नेहमी विचारला जातो. परंतु, दीर्घकालीन संपत्ती निर्मिती ही केवळ एखादा चांगला फंड निवडण्यावर अवलंबून नसते, तर ती गुंतवणुकीच्या प्रवासात आपण घेत असलेल्या दैनंदिन आणि शिस्तबद्ध निर्णयांवरून ठरते, असा मोलाचा सल्ला 'एसबीआय म्युच्युअल फंडा'च्या गुंतवणूकदार शिक्षण उपक्रमाद्वारे देण्यात आला आहे. या उपक्रमात संपत्ती निर्मितीचे मुख्य सूत्र सांगताना खालील घटकांवर प्रकाश टाकण्यात आला आहे.

१) नियमित गुंतवणूक आणि 'टॉप-अप': गुंतवणुकीत परताव्याइतकेच रकमेचे सातत्य महत्त्वाचे आहे. उत्पन्न वाढेल तशी 'एसआयपी टॉप-अप'च्या माध्यमातून गुंतवणुकीची रक्कम वाढवणे दीर्घकाळासाठी फायदेशीर ठरते.

२) आर्थिक सुरक्षा कवच (इमर्जन्सी फंड): आयुष्यात अचानक येणाऱ्या वैद्यकीय किंवा इतर खर्चांसाठी आणीबाणीचा निधी असणे गरजेचे आहे. हा निधी नसल्यास, ऐनवेळी दीर्घकालीन गुंतवणुकीला धक्का पोहोचू शकतो.

३) चक्रवाढ व्याजासाठी वेळेचे महत्त्व: बाजाराची योग्य वेळ साधण्यापेक्षा बाजारात दीर्घकाळ टिकून राहणे महत्त्वाचे आहे. अनेक गुंतवणूकदार लवकर बाहेर पडल्यामुळे चक्रवाढ व्याजाच्या फायद्याला मुकतात.

४) पैशांचे योग्य वर्गीकरण: अल्पकालीन, आणीबाणी आणि दीर्घकालीन अशा वेगवेगळ्या उद्दिष्टांनुसार पैशांचे नियोजन केल्यास गुंतवणुकीत टिकून राहणे सोपे होते.

बाजारातील अनिश्चिततेच्या काळात 'एसआयपी' थांबवणे किंवा वारंवार फंड बदलणे यामुळे गुंतवणुकीच्या सातत्यावर पाणी फेरले जाते. आज माहितीचा मारा होत असताना बाजाराच्या प्रत्येक हालचालीवर प्रतिक्रिया देणे टाळले पाहिजे. गोष्टी अधिक गुंतागुंतीच्या न करता साधेपणा ठेवल्यास शिस्त राखणे सोपे जाते. संपत्ती निर्मिती हा ज्ञानापेक्षा वर्तनाचा खेळ आहे. यात कोणतीही चमत्कारी खेळी काम करत नाही, तर सातत्याने केलेली गुंतवणूक, योग्य वाटप आणि अनिश्चिततेच्या काळात राखलेला संयम यांमुळेच खऱ्या अर्थाने संपत्ती निर्माण होते.

# पेसा क्षेत्रात आदिवासींना किमान ५० टक्के प्रतिनिधित्व अनिवार्य!

## ट्रायबल फोरमची राज्यपाल, मुख्यमंत्री, निवडणूक आयोगाकडे धाव : घटनात्मक हक्काचा मुद्दा

भिवंडी (दै. संध्या)

अनुसूचित क्षेत्रातील (पेसा) ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपंचायत, नगरपरिषद या स्थानिक स्वराज्य संस्थेत अनुसूचित जमातीसाठी पेसा कायदा १९९६ च्या ४ (छ) आणि संविधानातील तरतुदींनुसार आदिवासी सदस्यांच्या किमान ५० टक्के जागा राखीव ठेवण्याची मागणी 'ट्रायबल फोरम' या संघटनेने केली आहे.या संदर्भात महामहिम राज्यपाल,मुख्यमंत्री, निवडणूक आयोगाचे आयुक्त यांना निवेदन पाठविले आहे. पेसा कायदा कलम ४(छ) नुसार अनुसूचित क्षेत्रातील पंचायतीमधील जागांचे आरक्षण हे त्या पंचायतीमधील आदिवासींच्या लोकसंख्येच्या एकूण लोकसंख्येशी जे प्रमाण असेल त्या प्रमाणात राहायला पाहिजे.परंतू अनुसूचित क्षेत्रात समाविष्ट असलेल्या पंचायतीमधील जागांचे आदिवासींसाठी असलेले आरक्षण जागांच्या एकूण संख्येच्या निम्म्या पेक्षा कमी असणार नाही आणि सर्व पातळीवरील पंचायतीच्या सभापतीच्या सर्व जागा आदिवासींसाठी राखीव असायला पाहिजे.

महामहीम राष्ट्रपतींनी एकदा घोषित केलेले अनुसूचित क्षेत्र हे महामहीम राष्ट्रपती जोपर्यंत रद्द करीत नाही तोपर्यंत त्या अनुसूचित क्षेत्राचे लाभ मिळणे अनिवार्य आहे. एखाद्या पूर्णतः अनुसूचित क्षेत्रातील पंचायतीमध्ये ५० टक्के पेक्षा कमी अनुसूचित जमातींची लोकसंख्या असेल तरी त्या पंचायतीमध्ये ५० टक्के सदस्य आदिवासी असतील.तसेच त्या पंचायतीमध्ये सरपंच किंवा सभापती किंवा अध्यक्ष आदिवासी असतील.

निवडणूक आयोग ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद व नगरपरिषद, नगरपंचायत अंतर्गत येणाऱ्या राखीव व खुल्या पदांच्या जागा महाराष्ट्र निवडणूक कार्यक्रमानुसार महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम १०,महाराष्ट्र जिल्हा परिषद अधिनियम १९६१ मधील कलम १२, पोटकलम २ चा खंड (ग) आणि महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम १९६५ च्या अनुच्छेद २४३ झेड,२४३ झेड ए अन्वये घेण्याबाबत कळवितात.आणि अनुसूचित क्षेत्रातील पंचायत समिती (अंशतः अनुसूचित क्षेत्रातील पंचायतीसह) व जिल्हा परिषदेसाठी लोकप्रतिनिधींची पदे अनुसूचित जमातीसाठी महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती कायदा १९६१ च्या कलम १२ (२) (बी) आणि ५८ (१-बी) नुसार चक्रानुक्रमे (रोटेशन) पद्धतीने आरक्षण सोडत काढतात.

पेसा क्षेत्रात रोटेशन पद्धतीमुळे ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदेसाठी पारित झालेल्या पेसा कायद्याच्या कलम ४ (जी) च्या परंतुकाच्या तरतुदींचे उल्लंघन होते.आणि नगर परिषद, नगर पंचायतीसाठी संविधानात दिलेल्या अनुच्छेद २४३ यग चे उल्लंघन होते.चक्रानुक्रमे पद्धतीमुळे अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद सदस्यांच्या जागा वेगवेगळ्या प्रभागात, गटात, गणात किंवा वार्डात विभागल्या जातात.

म्हणून प्रभाग किंवा गण किंवा गटात रोटेशन पद्धत न ठेवता त्या जागा आदिवासीसाठी लोकसंख्येच्या प्रमाणात राखीव ठेवून बिगर अनुसूचित क्षेत्रात फिरते आरक्षण आळीपाळीने ठेवण्यात यावे.अशीही मागणी करण्यात आली आहे.

जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम १९६१ तसेच २३ सप्टेंबर २०२१ रोजी शासनाने मागासवर्ग आरक्षणाबाबत जारी केलेला सुधारित अध्यादेश क्र.३ हे संसदेने पारित केलेल्या पेसा कायद्याला वरचढ ठरत नाहीत. राज्याचा कायदा मोठा की केंद्राचा कायदा मोठा ? असाही प्रश्न ट्रायबल फोरमने उपस्थित केला.

> "संविधानातील पाचव्या अनुसूचीनुसार महामहिम राष्ट्रपती यांनी २ डिसेंबर १९८५ रोजी घोषित केलेल्या अनुसूचित क्षेत्रात राज्यातील १३ जिल्ह्यात २३ तालुके पूर्णतः आणि ३६ तालुके अंशतः अनुसूचित क्षेत्रात येतात. पंचायती संबंधी तरतूदी संविधान (७३ वी सुधारणा ) अधिनियम १९९२ संविधानात समाविष्ट केलेल्या आहेत.पेसा कायदा १९९६ च्या पॅरा ३ आणि ४ नुसार संविधानात काहीही असले तरी पंचायत संबंधी पेसा कायद्यातील तरतूदींशी विसंगत निर्णय अथवा कायदा करता येणार नाही.
>
> - ॲड. प्रमोद घोडाम राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष, ट्रायबल फोरम.

# शिवसेना खासदार डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे यांना दुसऱ्यांदा 'संसद रत्न पुरस्कार' जाहीर

मुंबई (दै. संध्या)

- संसदेतील प्रभावी कामगिरी, जनहिताचे प्रश्न आणि अभ्यासपूर्ण मांडणीची राष्ट्रीय स्तरावर दखल
- प्रभावी सहा खासगी विधेयकांची संसदेत मांडणी



देशातील संसदेतील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खासदारांना दिला जाणारा प्रतिष्ठेचा "संसद रत्न पुरस्कार २०२६" यंदा खासदार डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे यांना जाहीर झाला आहे. विशेष म्हणजे दुसऱ्यांदा त्यांना हा सन्मान प्राप्त होत असून, २०२४ नंतर पुन्हा एकदा त्यांच्या संसदीय कामगिरीची राष्ट्रीय स्तरावर दखल घेण्यात आली आहे. संसदेत नागरिकांच्या प्रश्नांना सातत्याने वाचा फोडणे, देशहिताच्या विषयांवर अभ्यासपूर्ण मांडणी करणे, विकास, आरोग्य, पायाभूत सुविधा, युवक, रोजगार, शहरी प्रश्न प्रभावीपणे मांडणे. याचबरोबर त्यांनी एक वर्षाच्या कालावधीत त्यांनी मांडलेल्या सहा महत्त्वाच्या खासगी विधेयकांच्या अनुषंगाने त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

संसद रत्न पुरस्कार समितीच्या घोषणेनुसार, यंदा देशभरातील १० लोकसभा खासदार, २ राज्यसभा खासदार आणि ४ संसदीय समित्यांमधील खासदारांची निवड करण्यात आली आहे. या निवड प्रक्रियेमध्ये खासदारांची संसदेतील उपस्थिती, चर्चांमधील सहभाग, विचारलेल्या प्रश्नांची गुणवत्ता, जनहिताच्या मुद्द्यांवरील सातत्यपूर्ण पाठपुरावा, खासगी विधेयक आणि संसदीय योगदानाचा व्यापक आढावा घेतला जातो. संसद रत्न पुरस्काराची स्थापना २०१० साली 'प्राईम पॉईंट फाऊंडेशन' या संस्थेमार्फत करण्यात आली होती. भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या सूचनेनंतर या पुरस्काराला सुरुवात झाली. संसदीय लोकशाही अधिक सक्षम व्हावी, लोकप्रतिनिधींनी संसदेमध्ये प्रभावीपणे जनतेचे प्रश्न मांडावेत आणि सकारात्मक संसदीय परंपरांना प्रोत्साहन मिळावे हा या पुरस्कारामागील मुख्य उद्देश आहे. या पुरस्कारासाठी निवड करताना संसदेतील अधिकृत आकडेवारी, पीआरएस लेजिस्लेटिव्ह रिसर्च, लोकसभा आणि राज्यसभा सचिवालयातील माहितीचा आधार घेतला जातो. ज्युरीमध्ये माजी संसदीय अधिकारी, घटनातज्ज्ञ आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा समावेश असतो. त्यामुळे संसद रत्न पुरस्कार हा संसदीय क्षेत्रातील अत्यंत प्रतिष्ठेचा आणि विश्वासार्ह सन्मान मानला जातो. खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी गेल्या काही वर्षांत संसदेत सातत्याने सक्रिय भूमिका बजावत महाराष्ट्र आणि विशेषतः कल्याण लोकसभा मतदारसंघाशी संबंधित अनेक प्रश्न प्रभावीपणे मांडले. रेल्वे, वाहतूक, आरोग्य सुविधा, शहरी विकास, पायाभूत सुविधा, रोजगार निर्मिती, युवकांचे प्रश्न, पर्यावरण तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित मुद्द्यांवर त्यांनी सातत्याने आवाज उठवला. देशाच्या विकासाला गती देणाऱ्या विविध धोरणांवर सकारात्मक चर्चा करताना जनतेच्या अडचणी देखील ठामपणे मांडण्याची त्यांची शैली संसदेत विशेष लक्षवेधी ठरली.

# सिद्धी विनायक मंदिराच्या कॉरिडॉरचे काम सोमवार पासून सुरू होणार

- सोमवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन होणार
- भाविकांसाठी वाहन पार्किंग आणि पायाभूत सुविधा उपलब्ध होणार.
- ४००-५०० कोटी रुपये खर्चाने कॉरिडॉरचे बांधकाम
- आचार्य पवन त्रिपाठी, मंदिर ट्रस्टचे खजिनदार



भिवंडी (दै. संध्या)

गेल्या काही महिन्यांपासून, विविध कारणांमुळे प्रलंबित सिद्धिविनायक मंदिर कॉरिडॉर प्रकल्पाला अखेर मंजुरी मिळाली आहे. या महिन्याच्या २५ तारखेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते कॉरिडॉरच्या कामाला सुरुवात होणार आहे. या प्रकल्पामुळे मंदिराला केवळ नवीन रूपच मिळणार नाही, तर भाविकांना विविध पायाभूत सुविधाही मिळतील, वाहतुकीवर नियंत्रण येईल, भाविकांच्या वाहनांची पार्किंग सुलभ होईल, मंदिराच्या परिसरातील तीव्र वाहतूक कोंडी कमी होईल आणि भाविकांना अनेक समस्यांपासून दिलासा मिळेल, असे मंदिर ट्रस्टचे खजिनदार आचार्य पवन त्रिपाठी यांनी सांगितले.

प्रभादेवी येथील सिद्धिविनायक मंदिर हे मुंबईतील प्रसिद्ध मंदिरांपैकी एक आहे. येथे दररोज हजारो भाविक आणि पर्यटक येतात, मंगळवारी आणि इतर सण-उत्सवांच्या दिवशी दोन लाखांहून अधिक, तर अंगारका संकष्टीच्या दिवशी सुमारे १०-१२ लाख भाविक येतात. यामुळे गणेश मंदिराच्या परिसरात प्रचंड गर्दी होते. सिद्धिविनायक मंदिर आधीच विविध दहशतवादी संघटनांच्या लक्ष्याच्या यादीत आहे. यामुळे, दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना कडक सुरक्षा पुरवण्याची जबाबदारी मंदिरावर आहे. यासोबतच, मंदिराच्या परिसरात चोवीस तास कडक पोलीस बंदोबस्त असतात. दहशतवादी हल्ले रोखण्यासाठी मंदिरासमोरील मुख्य रस्त्याच्या अर्ध्या भागावर संरक्षक भिंत बांधण्यात आली आहे. यामुळे रस्ता अरुंद झाला आहे. कॉरिडॉरच्या कामाचा भाग म्हणून, त्याचा आकारही बदलण्यात आला आहे.

त्रिपाठी म्हणाले की, तासन्तास रांगेत उभ्या असलेल्या भाविकांना स्वच्छ पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे आणि इतर सुविधा व पायाभूत सुविधा पुरवणे हा या कॉरिडॉर प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे. त्याचप्रमाणे, या कॉरिडॉर प्रकल्पांतर्गत मंदिराच्या परिसरातील रस्ते आणि पदपथांचे सुशोभीकरण, पादचाऱ्यांसाठी विशेष मार्ग, वाहतूक नियंत्रण, भूमिगत पार्किंग, मंदिर आणि भाविकांना पुरवण्यात येणारी सुरक्षा अधिक मजबूत करणे इत्यादी कामे केली जातील. तसेच, मंदिराला आधुनिक वैशिष्ट्यांसह नवीन रूप दिले जाईल. यावेळी मंदिराला कोणतीही हानी न पोहोचवता धार्मिक आणि सांस्कृतिक वारसा जतन करण्याला प्राधान्य दिले जात आहे.

दरम्यान, दर मंगळवारी मंदिरात येणाऱ्या भाविकांच्या सोयीसाठी, बेस्ट दादर रेल्वे स्टेशनपासून मंदिरापर्यंत मोफत बस सेवा पुरवत आहे. ही सेवा पहाटेपासून मध्यरात्री १२ वाजेपर्यंत उपलब्ध असेल. बेस्ट बसेसना या कॉरिडॉरमधून थांबण्यासाठी आणि परत फिरण्यासाठी जागा दिली जाईल.

या कॉरिडॉर प्रकल्पासाठी आवश्यक जमीन संपादित करून हस्तांतरित करण्याची, तसेच विविध विभागांकडून आवश्यक परवानग्या, मंजुऱ्या आणि इतर प्रक्रिया पूर्ण करण्याची प्रक्रिया नुकतीच पूर्ण झाली आहे. यामुळे या कॉरिडॉरच्या अंमलबजावणीचा मार्ग मोकळा झाला आहे.

देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत कामाला सुरुवात होईल. या कॉरिडॉर प्रकल्पाचा अंदाजित खर्च सुमारे ४००-५०० कोटी रुपये आहे. कामाच्या पहिल्या टप्प्यासाठी सुमारे ७८-९३ कोटी रुपयांच्या निविदा मागविण्यात येतील. या कॉरिडॉर प्रकल्पाचे काम उच्च स्तरावर आकार घेत आहे. प्रभादेवी येथील सिद्धिविनायक मंदिराला भेट देणाऱ्या भाविकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. प्रत्येक मंगळवारी, सण, जत्रा आणि शुभ दिवशी होणाऱ्या प्रचंड वाहतुकीमुळे मंदिराच्या परिसरात राहणाऱ्या स्थानिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. पर्यटक आणि भाविकांच्या गर्दीमुळे मंदिराच्या आजूबाजूचे रस्ते आणि लहान गल्ल्यांमध्येही गर्दी होते.

टॅक्सी, रुग्णवाहिका, अग्निशमन दलाच्या गाड्या आणि पोलिसांच्या व्हॅन यांना मंदिरापर्यंत पोहोचण्यासाठी खूप मेहनत करावी लागते. मंदिराला लागूनच मुलींचे एक माध्यमिक विद्यालयही आहे. मुलींना सोडायला आणि घ्यायला येणाऱ्या पालकांनाही वाहतूक कोंडीमुळे त्रास सहन करावा लागत आहे. यामुळे स्थानिक लोक अनेक वर्षांपासून ही समस्या सोडवण्यासाठी सरकारकडे आवाहन करत आहेत. अखेर कॉरिडॉरच्या कामाला सुरुवात होणार असल्याने, भाविकांच्या तसेच स्थानिकांच्या समस्या लवकरच सुटतील अशी आशा व्यक्त होत आहे.

# श्री स्वामी समर्थांच्या पादुका पालखीचे आगमन, दर्शनासाठी भक्तांची गर्दी

## पादुका सोहळ्यास कलाकारांची विशेष लक्षणीय उपस्थिती

भिवंडी (दै. संध्या)

दरसालाबादप्रमाणे श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ (ट्रस्ट) अक्कलकोट यांनी आयोजित केलेल्या श्री स्वामी समर्थ पालखी पादुका परिक्रमास यंदा २९ वर्षे पुर्ण झाले आहेत. या निमित्ताने भिवंडी शहरातील कोंबडपाडा येथे स्वामीभक्त सुभाष (नाना) झळके यांच्या स्वामी स्वतः झळके निवास या निवासस्थानी श्री स्वामी पालखी पादुकाचे आगमन झाले आहे. त्यामुळे पादुका पुजन व महाआरती, महाप्रसाद सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी हजारो महिला व स्वामी भक्तांनी दर्शनासाठी गर्दी केली होती.

भिवंडी शहरातील श्री स्वामी सेवा प्रचारक व प्रसारक मंडळ, भिवंडी या संस्थेच्या सदस्यांनी कोंबडपाडा येथील स्वामीसुत निवास येथे दुपारी ११ ते २ वाजेपर्यंत पादुका पालखी महाआरती दर्शन सोहळा आयोजित केला होता. पालखीचे आगमन झाल्यानंतर स्वामी सेवक सुभाष उर्फ नाना झळके व संस्थेचे पदाधिकारी आणि स्थानिक भक्तगण यांनी पालखीचे यथायोग्य पूजाविधी करून महाआरती केली. यावेळी भक्तगणांनी दर्शन आणि महाप्रसादाचा लाभ घेतला. त्यानंतर स्वामींच्या पादुका दर्शनासाठी विविध भक्तगणांच्या घरी नेण्यात आल्या.

भिवंडी मधील स्वामीभक्त दर्शनार्थ पादुका परिक्रमा पूर्ण झाल्यानंतर पुन्हा पादुका कोंबडपाडा येथील स्वामी सूत,झळके निवास येथे वस्तीस्थानी आल्यानंतर या ठिकाणी रात्री आठ वाजता महाआरती करण्यात आली. त्यानंतर भिवंडीतील कासारवाडी परिसरातील साईभक्त भजनी मंडळ यांनी यानिमित्ताने भजन सेवा देऊन कार्यक्रम रंगतदार केला. यावेळी खास करून डोंबिवलीहून रेल्वे भजन रील स्टार अविनाश आमरे यांनी आपल्या सुश्राव्य गायनाने मनोरंजन करीत उपस्थित स्वामी भक्तांमध्ये नवचैतन्य निर्माण करून संपूर्ण वातावरण भक्तीमय केले.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ, अक्कलकोट श्री स्वामी समर्थ पालखी पादुका परिक्रमानिमित्ताचे औचित्य साधून,कुमार स्वप्नील इंटरटेनमेंट प्रस्तुत, लेखक, दिग्दर्शक,निर्माता कुमार स्वप्नील कोळी यांच्या उपस्थितीमध्ये साक्षात स्वामी समर्थ या यूट्यूब चैनल वरील.

सिरीयलमधील कलाकार अँड.अमर बाबर, स्वामीभक्त दिनेश शेलार, आणि साक्षात स्वामी समर्थ या सिरीयलचे स्वामींची भूमिका साकार करणारे अभिनेते सुनील जगताप यांची विशेष उपस्थिती होती. याप्रसंगी सदर स्वामी समर्थ महाराजांच्या उपस्थित स्वामी भक्तांना आपले अनुभव या सिरीयलच्या माध्यमातून प्रेक्षकांच्या समोर आणण्याचे व हे अनुभव शेअर करण्याविषयी आवाहन करण्यात आले.



या श्री स्वामी समर्थ पादुका पालखी सोहळ्यासाठी भिवंडी न्यायालयाचे न्यायमूर्ती श्रीकांत सुतार, भिवंडी महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त विठ्ठल डाके, ट्रायबल फोरम या संघटनेचे कोकण विभागीय कार्याध्यक्ष व ठाणे जिल्हा वृत्तपत्र लेखक संघाचे नवनिर्वाचित अध्यक्ष सुनील झळके, विवेक मालसे यांच्यासह प्रशासकीय, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व साहित्यिक, पत्रकारिता अशा विविध क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती उपस्थित होते.बहुतांशी श्री स्वामी समर्थ भक्तांसह हजारो नागरिकांनी तीर्थप्रसादाचा लाभ घेतला.

हजारोच्या संख्येने स्वामी भक्तांची उपस्थिती,साक्षात स्वामी समर्थ या यूट्यूब चैनल वरील लेखक, दिग्दर्शक, निर्माता व कलाकार आणि रेल्वे भजन रील स्टार अविनाश आमरे यांच्या विशेष लक्षणीय उपस्थितीमुळे श्री स्वामी समर्थ पादुका पालखी सोहळा सर्व स्वामी भक्तांसाठी संस्मरणीय असा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

सदर श्री स्वामी समर्थ पादुका पालखी सोहळा यशस्वी करण्यासाठी भिवंडीतील स्वामीभक्त विशाल कुंभार, समीर खिस्मतराव,संतोष भावार्थे ,विनायक शिंदे, विकास भोई, मिलिंद पळसुळे, नागेश झंपाल,भाई वनगे, अशोक पालांडे, भालचंद्र, संतोष कोंडलेकर इत्यादींनी अतिशय मेहनत घेतली.

# भारतातील झपाट्याने वाढणारी 'सायलेंट' आरोग्य समस्या

मुंबई (दै. संध्या)

भारतात बदलती जीवनशैली, चुकीच्या आहाराच्या सवयी आणि वाढते मेटाबॉलिक आजार यामुळे हायपरयुरिसेमिया ही समस्या वेगाने वाढत असल्याची चिंता आरोग्य तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. शरीरात युरिक ॲसिडचे प्रमाण वाढल्यास सुरुवातीच्या टप्प्यात कोणतीही स्पष्ट लक्षणे दिसून येत नाहीत. त्यामुळे ही समस्या अनेकदा दुर्लक्षित राहते. मात्र दीर्घकाळ युरिक ॲसिडचे प्रमाण जास्त राहिल्यास गाऊटचे तीव्र झटके, किडनी स्टोन, मूत्रपिंडाशी संबंधित गुंतागुंत तसेच उच्च रक्तदाब, मधुमेह, लठ्ठपणा आणि हृदयविकारांसारख्या गंभीर समस्या उद्भवू शकतात. तज्ज्ञांच्या मते, भारतात शहरीकरण, फास्ट फूडचे वाढते सेवन, शारीरिक निष्क्रियता आणि तणावपूर्ण जीवनशैली यामुळे ही समस्या झपाट्याने वाढत आहे.

मानवी शरीरात युरिक ॲसिड नैसर्गिकरित्या तयार होते. शरीरातील पेशींमध्ये असलेले पुरिन्स तुटल्यानंतर युरिक ॲसिड निर्माण होते आणि सामान्यतः ते मूत्राद्वारे शरीराबाहेर टाकले जाते. परंतु शरीरात युरिक ॲसिडचे उत्पादन जास्त झाल्यास किंवा मूत्रपिंड ते योग्य प्रकारे बाहेर टाकू शकले नाहीत, तर रक्तात त्याचे प्रमाण वाढते. यालाच हायपरयुरिसेमिया म्हटले जाते. अनेक अभ्यासांनुसार भारतातील जवळपास प्रत्येक चौथ्या प्रौढ व्यक्तीमध्ये युरिक ॲसिडचे प्रमाण वाढलेले आढळते, मात्र सुरुवातीला लक्षणे नसल्यामुळे अनेकांना याची कल्पनाही नसते.

डॉ. अंकित राय, असोसिएट डायरेक्टर, मेडिकल अफेअर्स, ॲबॉट इंडिया यांनी सांगितले की, "युरिक ॲसिड वाढले तरी सुरुवातीला शरीर कोणतेही स्पष्ट संकेत देत नाही. त्यामुळे नियमित तपासणी करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. विशेषतः लठ्ठपणा, मधुमेह, उच्च रक्तदाब, सांध्यात वेदना किंवा किडनी स्टोनचा इतिहास असलेल्या व्यक्तींनी वेळोवेळी तपासणी करणे आवश्यक आहे.

# 'एआय' तंत्रज्ञानाने कमी खर्चात घ्या एकरी सव्वाशे टन ऊस उत्पादन

## डॉ. विवेक भोईटे यांचे शेतकऱ्यांना आवाहन

**सासवड (दै. संध्या)**

"शेतकऱ्यांपुढे सध्या अनेक अडचणी आहेत, मात्र 'एआय' तंत्रज्ञान हा त्यावर एक उत्तम आणि सक्षम पर्याय आहे. केवळ ऊस हेच एक असे पीक आहे ज्याला शाश्वत बाजारपेठ आहे. त्यामुळे आधुनिक एआय तंत्रज्ञानाचा वापर केल्यास कमी पाण्यात आणि कमी खर्चात एकरी सव्वाशे ते दीडशे टन उसाचे विक्रमी उत्पादन घेणे सहज शक्य आहे," असा विश्वास बारामती कृषी विज्ञान केंद्राचे कृषी तज्ज्ञ डॉ. विवेक भोईटे यांनी व्यक्त केला. सासवड (ता.पुरंदर) येथील शरद कृषी व पर्यावरण विकास प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित 'पुरंदर कृषी एक्स्पो २०२६' च्या दुसऱ्या दिवशी शनिवारी (ता.२३) 'एआय तंत्रज्ञानाचा वापर करून किफायतशीर ऊस शेती' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी ग्रामीण संस्थेच्या अध्यक्षा राजवर्धिनी जगताप, नीरा बाजार समितीचे सभापती संदीप फडतरे, संयोजक प्रदीप पोमण, प्रकाश पवार, संभाजी गरूड, विलास जगताप, नंदकुमार जगताप, अशोक निगडे, धैर्यशील धुमाळ, वसंतराव जगताप, रवींद्रपंत जगताप यांच्यासह पुरंदर तालुक्यातील शेकडो शेतकरी उपस्थित होते.

डॉ. विवेक भोईटे यांनी राज्यातील गेल्या चार दशकांतील ऊस शेतीचा आढावा घेत, आता डिजिटल क्रांतीचा स्वीकार करण्याची गरज अधोरेखित केली. त्यांनी उसाच्या प्रत्येक अवस्थेत एआय तंत्रज्ञानाचा वापर कसा करावा, याबाबत सविस्तर माहिती दिली. एआय तंत्रज्ञानाद्वारे हवेतील व जमिनीतील तापमान, आद्रता आणि अचूक माती परीक्षण करता येते. जमिनीच्या प्रकारानुसार उसाच्या दोन ओळींमधील लागवडीचे अंतर किती ठेवावे, याचे अचूक नियोजन एआय सॉफ्टवेअर करून देते. बियाणे बुरशीनाशकात बुडवून नऊ महिन्यांच्या उसाची किंवा शक्यतो तयार रोपांची लागवड करावी. सुरवातीला द्यावयाचा बेसल डोस जमिनीच्या गरजेनुसार एआय ठरवू शकते. उसाच्या प्रत्येक आठवड्यातील वाढीची अवस्था पाहून, ऊस तुटेपर्यंत नेमके किती पाणी, कधी आणि किती वेळ द्यायचे, तसेच विद्राव्य खतांचे शेड्युल कसे असावे, याचे तंतोतंत व्यवस्थापन एआय प्रणालीद्वारे होते.

याबरोबरच पिकावर येणारे संभाव्य रोग आणि कीड येण्यापूर्वीच एआय तंत्रज्ञान शेतकऱ्यांना पूर्वकल्पना देते. त्यामुळे वेळेत औषध फवारणी करून मोठे नुकसान टाळता येते., असेही डॉ. भोईटे यांनी सांगितले. व्याख्यानाच्या शेवटी डॉ. भोईटे यांनी उपस्थित शेतकऱ्यांच्या विविध शंका व प्रश्नांना उत्तरे दिली. पुरंदरमधील शेतकऱ्यांनी पारंपरिक पद्धत बदलून या आधुनिक डिजिटल तंत्रज्ञानाचा अवलंब करावा, असे आवाहन त्यांनी केले.




■ सासवड येथील 'पुरंदर कृषी एक्स्पो २०२६' मध्ये 'एआय तंत्रज्ञानाचा वापर करून किफायतशीर ऊस शेती' या विषयावरील मार्गदर्शक बारामती केव्हीकेचे डॉ. विवेक भोईटे यांच्या सत्कारप्रसंगी राजवर्धिनी जगताप, प्रदीप पोमण, विलास जगताप, संभाजी गरुड. ■

## थोडक्यात पण महत्वाचे...




### खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांना सलग दुसऱ्यांदा संसदरत्न पुरस्कार

■ संसदेतील सर्वोत्तम कामगिरीचा सलग दुसऱ्या वर्षी गौरव

पुणे (दैनिक संध्या) : संसदेतील सर्वोत्तम कामगिरीसाठी राज्यसभा खासदार प्रा. डॉ. मेधा विश्राम कुलकर्णी यांना सलग दुसऱ्यांदा 'संसदरत्न' पुरस्कार जाहीर झाला आहे. मेधा कुलकर्णी यांच्यासह महाराष्ट्रातून भाजपचे हेमंत सावरा, स्मिता वाघ, शिवसेनेचे डॉ. श्रीकांत शिंदे व नरेश मस्के यांचा या पुरस्कारांमध्ये समावेश आहे. प्राईम पॉईंट फाउंडेशनच्या वतीने लोकसभा आणि राज्यसभेतील उल्लेखनीय कार्याबद्दल या वर्षी खासदारांना 'संसदरत्न' पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. पुरस्कारांचे यंदा १६ वे वर्ष होते. राज्यसभेची पहिलीच टर्म असलेल्या प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांनी संसदेत सक्रिय सहभाग नोंदवत सर्वच आघाड्यांवर उल्लेखनीय व लोक-देशहिताचे मुद्दे मांडत प्रभावी कामगिरी केली. सर्वोत्तम कामगिरीसाठी डॉ. कुलकर्णी यांना सलग दुसऱ्या वर्षी हा पुरस्कार जाहीर झाला असून, महाराष्ट्रासाठी आणि विशेषतः पुण्यासाठी ही गौरवाची बाब ठरली आहे. प्रा. कुलकर्णी यांनी रेल्वे, महिला सुरक्षा, आरोग्य, ग्रामीण विकास, शिक्षण, सामाजिक न्याय, कॉर्पोरेट जिहादच्या संबंधित विषयांवर संसदेमध्ये सातत्याने मुद्देसूद भाष्य केले आहे. विशेष सत्रात, झिरो अवर, प्रश्नोत्तरे व विविध विषयांवरील चर्चेत सक्रिय सहभाग नोंदवला आहे. नुकत्याच झालेल्या अधिवेशनात त्यांनी महिला सुरक्षा, विमा सुरक्षा, रेनवॉटर हार्वेस्टिंग, आधार प्रमाणीकरण, आरटीई प्रवेश प्रक्रिया, शेतजमिनी याबाबत लक्षवेधी मांडल्या. पुरस्कार जाहीर झाल्यानंतर आनंद व्यक्त करताना प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी म्हणाल्या, "सलग दुसऱ्यांदा संसदरत्न पुरस्कार जाहीर होणे आनंदाची गोष्ट आहे. हा सन्मान केवळ माझा नाही, तर जनतेच्या अपेक्षा संसदेत प्रभावीपणे मांडण्याच्या प्रयत्नांचा गौरव आहे. लोकशाहीत लोकप्रतिनिधीची खरी ओळख त्याच्या कृतिशीलतेत असते. जनतेच्या आशीर्वादाची ही पोचपावती आहे. यापुढेही लोकहितासाठी परखडपणे भूमिका मांडत राहील."



### माजी सैनिकाच्या शेतातून विनापरवाना रस्ता, सौर प्रकल्पासाठी विजेचे खांब

मंचर (दैनिक संध्या) : देशसेवेसाठी तब्बल १७ वर्षे लष्करामध्ये कार्यरत राहून जम्मू-काश्मीरच्या सीमावर्ती भागात सेवा बजावली. मात्र आता स्वतःच्या वडिलोपार्जित शेतजमिनीच्या प्रश्नासाठी न्याय मागण्याची वेळ आली असल्याची खंत माजी सैनिक भरत तुकाराम विश्वासराव यांनी व्यक्त केली आहे. वाळूंजवाडी (ता. आंबेगाव) येथील शेतजमिनीत विनापरवाना उभारण्यात आलेले वीज खांब व रस्त्याच्या कामामुळे शेतीच्या वापरावर गंभीर परिणाम होणार असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. आंबेगाव–जुन्नर तालुका माजी सैनिक संघटनेचे (राष्ट्रवादी काँग्रेस) अध्यक्ष भरत विश्वासराव यांनी या संदर्भात राज्याचे माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांची मंचर येथे शनिवारी (ता.२३) भेट घेऊन निवेदन दिले. यावेळी माजी सैनिक संघटनेचे पदाधिकारीही उपस्थित होते. विश्वासराव यांनी दिलेल्या माहितीनुसार, वाळूंजवाडी येथील गट क्रमांक २८८ मधील सुमारे १३ एकर शेतजमिनीच्या मध्यभागातून विनापरवाना रस्ता काढण्यात आला असून सौर प्रकल्पासाठी तब्बल १३ वीज खांब उभारण्यात आले आहेत. शेताच्या मध्यभागातून खांब उभारल्यास भविष्यात शेती मशागत, यांत्रिकीकरण, सिंचन व्यवस्था व देखभालीत मोठ्या प्रमाणावर अडथळे निर्माण होणार आहेत. त्यामुळे शेतीच्या वापरावर गंभीर परिणाम होईल, असा दावा त्यांनी केला. "माझा सौर प्रकल्पाला विरोध नाही. मात्र माझ्याच मालकीच्या जमिनीतून पूर्व किंवा पश्चिम बाजूने वीज खांब न्यावेत," अशी मागणी विश्वासराव यांनी केली आहे. या संदर्भात महावितरणच्या घोडेगाव येथील सहाय्यक अभियंता एस. बी. भोपळे यांनी संबंधित ठेकेदाराला कार्यवाहीच्या सूचना केल्याचे सांगण्यात आले. शेतकऱ्यांच्या सूचनेनुसार एका बाजूने काम करण्यासंदर्भात संबंधित ठेकेदार अशोक मोडवे यांना सूचना देण्यात आल्याचेही त्यांनी नमूद केले. मात्र, "१५ दिवस उलटूनही मध्यभागातील खांब हलविण्यात आलेले नाहीत. त्यामुळे जमीन विकसित करण्याचे काम खोळंबले आहे," असा आरोप विश्वासराव यांनी केला. "देशसेवा करताना आयुष्याचा महत्त्वाचा काळ राष्ट्रासाठी समर्पित केला. त्यामुळे एका माजी सैनिकाच्या न्याय्य मागणीचा विचार होणे अपेक्षित आहे. हा विषय केवळ माझ्या वैयक्तिक अडचणीचा नसून तमाम माजी सैनिकांच्या सन्मानाशी संबंधित आहे," अशी भावना विश्वासराव यांनी व्यक्त केली.

# ३६ तासांनंतर तो तरुण मोबाईल टॉवरवरून सुखरूप खाली उतरला

**भिवंडी (दै. संध्या)**



भिवंडीतील कोन गाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पिंपळघर परिसरात गेल्या ३६ तासांपासून सुरू असलेल्या हाय-व्होल्टेज नाट्याला शुक्रवारी अखेर पूर्णविराम मिळाला. आपल्या मागण्यांच्या निषेधार्थ मोबाईल टॉवरवर चढलेल्या श्याम गायकवाड या तरुणाला पोलीस आणि अग्निशमन दलाच्या पथकांनी सुखरूप खाली उतरवले. ही घटना संपूर्ण परिसरात तीव्र चर्चेचा विषय बनली. तो तरुण गेल्या ३६ तासांपासून मोबाईल टॉवरवर बसून होता. टॉवरजवळ येणाऱ्या-जाणाऱ्या लोकांची मोठी गर्दी जमली होती; लोक त्या माणसाकडे पाहण्यासाठी थांबत होते, सहानुभूती व्यक्त करत होते आणि मग पुढे निघून जात होते. अचानक टॉवरवर चढलेला तरुण श्याम गायकवाड हा मूळचा यवतमाळमधील इसापूरचा असल्याचे सांगितले जाते. टॉवरवर चढल्यानंतर त्याने वरून काही कागदपत्रे खाली फेकली. त्या कागदपत्रांनुसार, आपल्या वडिलोपार्जित जमिनीशी संबंधित एका प्रकरणी सरकार आणि प्रशासनाकडून अचूक माहिती आणि योग्य उत्तरे न मिळाल्याने तो तरुण अत्यंत संतप्त झाला होता. या प्रशासकीय उदासीनतेच्या निषेधार्थ त्याने मोबाईल टॉवरवर चढून हे अनोखे आंदोलन सुरू केले.

घटनेची माहिती मिळताच, कोनगाव पोलीस आणि अग्निशमन दलाचे जवान तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. पोलीस प्रशासकीय पथकाने लाऊडस्पीकर आणि इतर माध्यमांद्वारे त्या तरुणाला समजावण्याचा सतत प्रयत्न केला. सुमारे ३६ तासांच्या अथक प्रयत्नांनंतर आणि प्रशासनाच्या आश्वासनानंतर, तो तरुण अखेर टॉवरवरून खाली उतरण्यास तयार झाला. टॉवरवरून सुरक्षितपणे खाली उतरल्यानंतर, कोन गाव पोलिसांनी त्या तरुणाला उपचार आणि वैद्यकीय तपासणीसाठी तात्काळ भिवंडीच्या आयजीएम उप-जिल्हा रुग्णालयात नेले. डॉक्टरांच्या मते, त्या तरुणाची प्रकृती सध्या पूर्णपणे स्थिर आहे. तो तरुण टॉवरवर चढल्यापासून पोलीस आणि स्थानिक प्रशासन परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून होते. कोनगाव पोलिसांनी सांगितले की, वैद्यकीय तपासणीनंतर त्याला सोडून देण्यात आले असून तो घरी गेला आहे.

# शिवकालीन गड-दुर्ग व प्रेरणादायी वास्तूंचा अभ्यासपूर्वक प्रसार

**पुणे (दै. संध्या)**

'छत्रपती शिवाजी महाराजांप्रती आदर म्हणून आपण खूप काही करू शकतो. महाराजांच्या गड-दुर्गांची माहिती, त्यांचा प्रचार-प्रसार करणाऱ्या प्रेरणादायी वास्तू, शिवचरित्र यांचा इतिहास आपण अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवला पाहिजे,' असे मत युवा इतिहास अभ्यासक अमोघ वैद्य यांनी व्यक्त केले.

चैत्राली फाउंडेशनतर्फे आंबेगाव येथील 'शिवसृष्टी दर्शन' उपक्रमाचे मोफत आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी उपस्थित पर्यटकांसमोर ते बोलत होते. यावेळी शिवसृष्टी प्रकल्पाचे विश्वस्त गुणेश पुरंदरे, अनिल वळसंगकर, फाउंडेशनच्या अध्यक्षा सुवर्णा इंदोरे व फाउंडेशनचे सक्रिय सदस्य उपस्थित होते. प्रारंभी फाउंडेशनतर्फे पुरंदरे व वळसंगकर यांचा शाल व 'शी इज' पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला. त्यानंतर वैद्य यांनी उपस्थितांशी संवाद साधला.

'शिवकालीन वास्तू किंवा कोणत्याही काळातील वास्तूकला, शिल्पकला किंवा मंदिरे पाहताना ती नुसत्या डोळ्यांनी न पाहता अभ्यासाच्या दृष्टीने पाहावीत. त्यातून त्या काळच्या व्यक्तींची सौंदर्यदृष्टी दिसून येते. अनेक ठिकाणी निसर्गाची प्रतिके दिसतात. संरक्षणाच्या दृष्टीने केलेली योजना दिसते. शिवसृष्टी प्रकल्पात जवळपास सर्वच गोष्टींचा अतिशय सुंदररित्या अंतर्भाव केलेला आहे.

# कल्याणमध्ये दुर्गाडी किल्ला परिसरात नमाज, तर मंदिरात हिंदूंना प्रवेश बंदी

## भाजप आणि हिंदूत्ववादी संघटनांची आक्रमक भूमिका : डिसीपीकडे निवेदन

**भिवंडी (दै. संध्या)**

कल्याणमधील दुर्गाडी किल्ला परिसरात बकरी ईदच्या दिवशी रस्त्यावर होणाऱ्या नमाज पठणाच्या पार्श्वभूमीवर भाजप आणि हिंदूत्ववादी संघटनांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. नमाजासाठी रस्त्यांचा वापर करू नये, तसेच त्या दिवशी दुर्गाडी मंदिरात हिंदू भाविकांना प्रवेश देण्यात यावा, अन्यथा हनुमान चालीसा आणि दुर्गा स्तोत्र पठणाचे आंदोलन करण्यात येईल. असा इशारा भाजप नगरसेवक महेश पाटील आणि हिंदूवादी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी पोलिस प्रशासनाला दिला आहे. या

संदर्भातला निवेदन कल्याण डीसीपी अतुल झेंडे यांना देण्यात आला आहे. या संदर्भात भाजपच्या शिष्टमंडळाने कल्याणचे पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांना निवेदन सादर केले. निवेदनात बकरी ईदच्या दिवशी दुर्गाडी किल्ला परिसरातील ईदगाहवर होणाऱ्या नमाज पठणादरम्यान परिसरातील रस्त्यावरील नमाज आणि मंदिर प्रवेशावर निर्बंध घालण्यात येत असल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. नमाज पठण सुरु असताना दुर्गाडी मंदिरात हिंदू भाविकांना प्रवेश दिला जात नाही. दोन समाजात कोणत्याही प्रकारचा तेड निर्माण होऊ नये यासाठी पोलिसांची ही भूमिका असते.

मागील चाळीस वर्षांपासून शिवसेना आणि आणि हिंदूत्ववादी संघटना बकरी ईदच्या दिवशी घंटानात आंदोलन करीत आहेत. त्यांची मागणी असते आम्हाला बकरी ईदच्या दिवशी मंदिरात प्रवेश बंदी का? सर्व धर्मीयांना समान वागणूक मिळाली पाहिजे अशी त्यांची भूमिका आहे. त्यासाठी पोलिसांकडून मोठा बंदोबस्तही तैनात केला जातो.

भाजपा नगरसेवक महेश पाटील आणि काही हिंदूत्ववादी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी पोलीस प्रशासनाकडे मागणी करताना नमाजासाठी सार्वजनिक रस्त्यांचा वापर टाळण्याची व्यवस्था करावी आणि मंदिर प्रवेशावरील निर्बंध हटवावेत, असे म्हटले आहे. अन्यथा बकरी ईदच्या दिवशी दुर्गाडी परिसरात हनुमान चालीसा आणि दुर्गा स्तोत्र पठण करून आंदोलन करण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला आहे.

दरम्यान, या विषयावर अद्याप प्रशासनाकडून अधिकृत भूमिका जाहीर करण्यात आलेली नाही. मात्र सणाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस प्रशासन परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे.

या मागण्यांमुळे आणि आंदोलनाच्या इशाऱ्यामुळे दुर्गाडी परिसरातील वातावरण पुन्हा एकदा चर्चेचा विषय बनले असून प्रशासन कोणता निर्णय घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



# मोफत महाआरोग्य शिबीरात १८ हजार ६३१ जणांचा सहभाग

## सुवर्णयुग तरुण मंडळतर्फे जय गणेश रुग्णसेवा अभियानांतर्गत एकदिवसीय मोफत महाआरोग्य शिबीर ; पद्मविभूषण डॉ.रघुनाथ माशेलकर यांची उपस्थिती

**पुणे (दै. संध्या)**

मानव सेवेचे महामंदिर साकारत असताना रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा हे ब्रीद अंगीकारून कार्यरत असलेल्या श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळातर्फे विविध १३७ प्रकारच्या विविध तपासण्या करीत आयोजित मोफत महाआरोग्य शिबीरात १८ हजार ६३१ जणांची तपासणी व उपचार करण्यात आले. पुणे शहरासह राज्याच्या विविध भागातून आलेल्या रुग्णांच्या विविध तपासण्या करीत साहित्य व औषधे वाटप देखील करण्यात आले. याकरिता पुणे जिल्ह्यातील ९० रुग्णालये व संस्थांच्या प्रतिनिधींनी शिबीरात अखंड ९ तास सेवा दिली.




श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे रस्त्यावरील नू.म.वि. प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयात आयोजित महाआरोग्य शिबीराचे उद्घाटन ज्येष्ठ शास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ.रघुनाथ माशेलकर आणि आमदार हेमंत रासने यांच्या हस्ते झाले. यावेळी कसबा विश्रामबाग क्षेत्रीय कार्यालयाच्या डॉ. अंजली टिळेकर, डॉ.संजीव डोळे, डॉ. संदेश पटवर्धन, ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, उपाध्यक्ष डॉ.रामचंद्र उर्फ बाळासाहेब परांजपे, माणिक चव्हाण, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, सहचिटणीस अमोल केदारी, उत्सव प्रमुख अक्षय गोडसे, सुवर्णयुग तरुण मंडळाचे अध्यक्ष प्रकाश चव्हाण, मंगेश सूर्यवंशी, यतिश रासने, सौरभ रायकर, राजाभाऊ चव्हाण, राजाभाऊ पायमोडे, राजाभाऊ घोडके, विलास रासकर, अमोल चव्हाण यांसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. ट्रस्टतर्फे फिरता दवाखान्याचे लोकार्पणही यावेळी मान्यवरांच्या हस्ते झाले. ट्रस्टचे वैद्यकीय विभाग प्रमुख राजेंद्र परदेशी व सहकाऱ्यांनी शिबीराच्या नियोजनात विशेष सहभाग घेतला. डॉ.रघुनाथ माशेलकर म्हणाले, प्रत्येकाच्या आरोग्याची चाचणी होणे आवश्यक आहे. या चाचण्या योग्य वेळेत झाल्या तर नंतरचे दुष्परिणाम टाळता येतील. विकसित, संतुलित, समृद्ध, सुविद्य, सक्षम भारत व्हावा, यासाठी अशा शिबिरांच्या माध्यमातून व रुग्णसेवेच्या माध्यमातून ट्रस्टचे सुरु असलेले काम आशादायी आहे. आमदार हेमंत रासने म्हणाले, विकसित भारत घडविण्याकरिता प्रत्येक नागरिक निरोगी असणे गरजेचे आहे. नागरिकांनी निरोगी राहावे, याद्दष्टीने ट्रस्टतर्फे आरोग्य सेवा दिली जाते. यंदा महा आरोग्य शिबीराचे दुसरे वर्ष आहे. यामाध्यमातून हजारो शस्त्रक्रिया करण्यात आल्या असून अनेक उपचार मोफत करण्यात आले आहेत. यापुढेही हे रुग्णसेवेचे कार्य सातत्याने सुरु राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

महाआरोग्य शिबीराकरिता सुमारे १५ हजार नागरिकांनी नोंदणी केली होती.

शिबीरात हृदय आजार, किडनी, नेत्र आजार, दंत उपचार, स्त्री रोग, लहान मुलांच्या शस्त्रक्रिया, अपंगांना मोफत जयपूर फूट वाटप, रक्त तपासणी, रक्तदान शिबीर, ईएनटी, आयुर्वेदिक, होमिओपॅथी उपचार, अस्थिरोग, विविध थेरपी, रेडिओलॉजी, श्रवण आणि स्पीच थेरपी हे उपचार विनामूल्य करून देण्यात आले. तसेच महाराष्ट्र शासन आरोग्य विभाग व पुणे महानगरपालिकेच्या विविध योजनांचा लाभ कसा घ्यावा, याची माहिती देखील देण्यात आली. वर्षभरात ट्रस्टशी संलग्न विविध २२३ रुग्णालये आणि विविध संस्थांमधून आरोग्यसेवा दिली जात आहे.